रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १५ ◆ अंक ३३७
www.ramprahar.com
रविवार, २५ जून २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग
माणगाव पोलीस ठाण्याचा भर पावसात रूट मार्च/२
रविवारनिमित्त ‘रविप्रहर’मध्ये विविध विषयांवरील लेख/४
पेण नगरपालिकेचा अतिक्रमणावर हातोडा/७

## उद्धव ठाकरेंची बालबुद्धी : उपमुख्यमंत्री फडणवीसांचा टोला



**मुंबई :** उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला आहे. मी, माझे कुटुंब आणि माझा संपूर्ण भाजप परिवार एक खुली किताब आहे. ज्या ‘व्हॉटस्‌अॅप चॅट’बाबत तुम्ही बोलताय, ते आरोपपत्राचे भाग आहेत. लपवण्यासारखे आमच्याकडे काहीच नाही, पण मुख्यमंत्रीपदी राहिलेल्या माणसाला इतकी ‘बालबुद्धी’ असावी याचे मात्र आश्चर्य वाटते, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी ट्वीट केले. मुंबईला कुणी लुटले, मृतांच्या टाळूवरील लोणी कुणी खाल्ले, मराठी माणसाला कुणी ओरबाडले? १०० कोटींच्या वसुलीचे टार्गेट कसे दिले जाते? याची चिंता करा तसेच तुमची हास्यजत्रा चालू द्या. बघूच आता शवासन कुणाला करावे लागते, असेही उपमुख्यमंत्री फडणवीसांनी ट्विटर अकाउंटवरून म्हटले आहे. **(सविस्तर वृत्त पान २ वर..)**

# लोकनेते स्व. दि. बा. पाटील यांची संघर्षगाथा संग्रहालयातून साकारणार

### राज्य सरकारतर्फे मंत्री मंगलप्रभात लोढा यांची घोषणा

### पनवेलमध्ये स्किल सेंटरही उभारण्यात येणार



(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रकल्पग्रस्तांचे झुंझार लोकनेते दिवंगत दि. बा. पाटील यांच्या नावाने पनवेलमध्ये राज्य सरकारच्या वतीने संग्रहालय उभारण्यात येणार आहे. त्यासाठी पर्यटन विभागातर्फे पाच कोटी रुपये तरतुदीची तसेच येथील बेरोजगार तरुणांसाठी रोजगार मार्गदर्शन व प्रशिक्षणासाठी स्किल सेंटर उभारण्याची घोषणा कौशल्य विकास रोजगार, उद्योजकता, पर्यटन, महिला व बालविकासमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी शनिवारी (दि. २४) येथे केली. ते महारोजगार मेळाव्यात बोलत होते.

भूमिपुत्रांचे दैवत स्व. दि. बा. पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र रायगड-अलिबाग, लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समिती, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आगरी समाज मंडळाच्या पनवेल येथील महात्मा फुले सभागृहात महारोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. दरम्यान, या ठिकाणी आयोजित रक्तदान शिबिराचे उद्घाटन कृती समितीचे उपाध्यक्ष माजी खासदार लोकनेते ठाकूर यांच्या हस्ते झाले, तर राज्याचे उद्योगमंत्री तथा पालकमंत्री उदय सामंत यांनीही या मेळाव्याला भेट देऊन शुभेच्छा दिल्या.

या वेळी व्यासपीठावर प्रमुख मान्यवर म्हणून लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील, सल्लागार माजी मंत्री जगन्नाथ पाटील, कार्याध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, **(पान २ वर..)**



**पनवेल : प्रकल्पग्रस्तांचे झुंजार नेते दि. बा. पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांनी ‘दिबां’च्या संग्राम निवासस्थानी जाऊन अभिवादन केले. या वेळी ‘दिबां’चे पुत्र अतुल पाटील, माजी नगरसेवक नितीन पाटील, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, ज्येष्ठ कार्यकर्ते जगदिश घरत उपस्थित होते.**



**पनवेल : भूमिपुत्रांचे दैवत दि. बा. पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त आगरी समाज मंडळाच्या महात्मा फुले सभागृहात आयोजित रक्तदान शिबिराचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, माजी नगरसेवक नितीन पाटील, कृती समितीचे जे. डी. तांडेल आदी उपस्थित होते.**

### कर्नाळा बँक घोटाळा प्रकरण

## पाच लाखांपेक्षा जास्त ठेवी असणाऱ्यांना कधी परतावा मिळणार?

**पनवेल : प्रतिनिधी**




कर्नाळा नागरी सहकारी बँकेत केलेल्या ५१२.५० कोटी रुपयांच्या घोटाळाप्रकरणी शेकापचे माजी आमदार व बँकेचे अध्यक्ष विवेक पाटील यांच्यासह संचालक मंडळातील १४ सदस्य आणि इतर अशा एकूण ७६ जणांवर पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. यामध्ये माजी आमदार विवेक पाटील, बँकेच्या सीईओ अपर्णा वडके आणि आता हेमंत सुताने यांना अटक करण्यात आली आहे. अभिजित पाटील व इतरांना कधी अटक होणार आणि पाच लाखांपेक्षा जास्त ठेवी असणाऱ्या ठेवीदारांना पैसे कधी परत मिळणार हा प्रश्न अनुत्तरितच आहे.

आपल्याच पक्षाच्या आमदाराने म्हणजे विवेक पाटील यांनीच शेकडो कोटी रुपयांचा घोळ घातल्याने हे पाटील दोन वर्षे तुरूंगातच आहेत. असे असूनही शेकापचे नेते मात्र तुरुंगात असणाऱ्या या आपल्या नेत्याचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करीत असल्याचे आठवडाभरापूर्वीच दिसून आले. लोकांचे पैसे खाणे वा गैरवापर करणे यात काहीही सोयरसुतक शेकापला नसल्याचे जेलमध्ये असलेल्या विवेक पाटील यांच्या वाढदिवसावरून स्पष्ट झाले.

कर्नाळा बँकेत घोटाळा झाल्यापासून ठेवीदार, खातेदारांना न्याय मिळवून देण्यासाठी भाजपचे आमदार प्रशांत ठाकूर आणि महेश बालदी यांनी कर्नाळा बँक ठेवीदार संघर्ष समिती स्थापून लढा सुरू केला. माजी खासदार किरीट सोमय्या यांच्या मार्गदर्शनाखाली घोटाळ्याचे आरबीआयला पत्र व त्याचा पाठपुरावा, रिझर्व्ह बँकेवर मोर्चा, कर्नाळा बँकेवर मोर्चा, सीआयडी, पोलीस आयुक्त, सहकार, ईडी यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्या वेळी अनेकांना बँकेत घोटाळा झाल्याचे मान्य नव्हते. विवेक पाटील यांनी तर छातीठोकपणे घोटाळा झालाच नाही, मी पैसे खाल्ले असतील तर स्वतःला जाळून घेईन, असे म्हटले होते. राज्यातील तत्कालीन राज्यकर्त्यांच्या पाठिंब्यामुळे आपल्याला काहीच होणार नाही या भ्रमात असलेल्या विवेक पाटील यांच्यावर अखेर ईडीने कारवाई करून त्यांना अटक केली. नंतर त्यांची २३४ कोटींची मालमत्ता जप्त करण्यात आली. **(पान २ वर..)**

## निवडक

### पंतप्रधान मोदी इजिप्तमध्ये दाखल; जोरदार स्वागत

**कैरो :** पंतप्रधान नरेंद्र मोदी हे अमेरिकेचा तीन दिवसीय दौरा आटोपून इजिप्तच्या दौऱ्यावर गेले आहेत. इजिप्तची राजधानी कैरो येथील विमानतळावर त्यांचे लष्कराने बँड वाजवून जोरदार स्वागत केले. पंतप्रधान मोदींचा इजिप्तमधील हा पहिलाच अधिकृत दौरा असून या ठिकाणी दोन दिवस विविध मुद्द्यांवर द्विपक्षीय चर्चा होणार आहे. त्यामुळे भारताला विविध क्षेत्रांमध्ये फायदा होईल.

### गणेशोत्सवासाठी कोकणात १५६ गणपती स्पेशल ट्रेन

**मुंबई :** गणेशोत्सवाकरिता कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांच्या सोयीसाठी मध्य रेल्वे प्रशासनातर्फे १५६ गणपती विशेष गाड्या चालविण्याची घोषणा करण्यात आली आहे. या गाड्या मुंबई ते सावंतवाडी रोड, लोकमान्य टिळक टर्मिनस ते कुडाळ, दिवा ते रत्नागिरी आणि मुंबई ते मडगावदरम्यान धावणार आहेत. त्यांचे आरक्षण २७ जूनपासून रेल्वेच्या सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि आयआरसीटीसीच्या संकेस्थळावर सुरू होणार आहे. **(अधिक वृत्त पान २ वर..)**

## बोरघाटात पीकअप टेम्पोवर कंटेनर उलटून दोघांचा मृत्यू, तरुण बचावला



**खालापूर, खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे महामार्गावर बोरघाटातील अंडा पॉईंटच्या वळणावर शनिवारी (दि. २४) सकाळी भरधाव ट्रेलरवरील कंटेनर समोरील पीकअप टेम्पोवर उलटून ट्रेलरचालकासह टेम्पोतील एका प्रवाशाचा मृत्यू झाला. या अपघातात कॉलेज तरुण बचावला आहे.

लोणावळ्यावरून मुंबईकडे जाणारा ट्रेलर (एचआर ४७-सी ६५४१) हा महामार्गावरील अंडा पॉईंट येथे आल्यानंतर चालकाचे नियंत्रण सुटल्याने हे वाहन समोरील पीकअप टेम्पोवर (एमएच १४-एचजी ७७९०) उलटले. या अपघातात ट्रेलरचालक गुरुदीप सिंग सरोवा (वय ५४, रा. ठाणे) आणि टेम्पोमधील प्रवासी सतीश पवार (वय ४५, रा. खोपोली) यांचा मृत्यू झाला, तर सुफीयान शेख मुल्ला (वय १९, रा. हाळ, खोपोली) हा महाविद्यालयीन तरुण सुदैवाने बचावला.

अपघाताचे वृत्त कळताच बोरघाट पोलीस, खोपोली पोलीस, देवदूत टीम तसेच आयआरबी पेट्रोलिंग टीम घटनास्थळी पोहचली आणि हायड्राच्या मदतीने वाहने बाजूला काढण्यात आली. मृतांचे पार्थिव शवविच्छेदनासाठी खालापूर प्राथमिक रुग्णालयात पाठविण्यात आले, तर जखमीला खोपोली नगरपालिका रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# पनवेलमध्ये लाभार्थी संमेलन उत्साहात

### मोदी सरकारच्या योजना नागरिकांपर्यंत पोहचविण्याचे आवाहन



(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशाचे यशस्वी व लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारला नऊ वर्षे पूर्ण झाली आहेत. या पार्श्वभूमीवर मोदी @ ९ कार्यक्रमांतर्गत महाजनसंपर्क अभियानाच्या अनुषंगाने पनवेल विधानसभा भाजपच्या वतीने शनिवारी (दि. २४) राज्याचे उद्योजकता व कौशल्य विकासमंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या अध्यक्षतेखाली लाभार्थी संमेलन उत्साहात झाले.

तक्का येथील श्री संत सावता माळी सभागृहात झालेल्या या संमेलनास प्रमुख पाहुणे म्हणून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, ज्येष्ठ नेते बाळासाहेब पाटील, जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, शहराध्यक्ष जयंत पगडे, माजी उपमहापौर सीता पाटील, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, विस्तारक अविनाश कोळी यांच्यासह माजी नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारच्या नऊ वर्षांच्या काळात समाजातील सर्व घटकांसाठी कल्याणकारी कार्य करण्यात आले. त्या अनुषंगाने भाजपतर्फे मोदी @ ९ कार्यक्रमांतर्गत महाजनसंपर्क अभियानाच्या अनुषंगाने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग असलेल्या लाभार्थी संमेलनास पनवेलमध्ये प्रतिसाद लाभला. या वेळी मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्यासह प्रमुख मान्यवरांनी मार्गदर्शन करून मोदी सरकारच्या योजनांची माहिती घरोघरी जाऊन नागरिकांना द्यावी, असे आवाहन केले.

# रायगडात जलधारा बरसल्या

### बळीराजासह समस्त नागरिक सुखावले



**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगडकर ज्याची चातकासारखी वाट पाहत होते त्या पावसाचे शनिवारी (दि. २४) रायगड जिल्ह्यात आगमन झाले. उकाड्याने हैराण नागरिकांना या पावसाने दिलासा मिळाला आहे, तर शेतकऱ्यांचे दुबार पेरणीचे संकट टळणार आहे.

हवामान खात्याचा अंदाज खरा ठरवत शनिवारी जिल्ह्यात पावसाने हजेरी लावली. सकाळपासूनच जिल्ह्याच्या सर्वच भागांत जलधारा बरसायला सुरुवात झाली. जिल्ह्याच्या दक्षिण भागात महाड, माणगाव, म्हसळा, पोलादपूर रोहा, नागोठणे भागात पावसाचा जोर अधिक दिसून आला, तर उत्तर रायगडात अलिबाग, पनवेलसह अन्य भागांत सकाळी पावसाची सर येऊन गेल्यानंतर संध्याकाळपर्यंत पावसाने उसंत घेतली होती. संध्याकाळी पुन्हा आभाळ भरून आले आणि थोड्याच वेळात पावसाला सुरुवात झाली.

### दुबार पेरणीचे संकट टळले

*वरुणराजाच्या आगमनामुळे करपणाऱ्या रोपांना जीवदान मिळाले आहे. शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट येईल, अशी भीती व्यक्त होत होती, परंतु पावसाने ती भीती दूर झाली आहे. दुसरीकडे ज्या शेतकऱ्यांनी पावसाअभावी पेरण्या थांबवल्या होत्या त्यांनीदेखील पेरणीला सुरुवात केली आहे.*

### उकाड्यापासून दिलासा

*जून संपत आला तरी पाऊस नाही आणि सूर्य आग ओकतोय अशी स्थिती होती. त्यामुळे नागरिक उकाड्याने कमालीचे हैराण झाले होते. अखेर पाऊस पडल्याने गारवा निर्माण झाला असून आल्हाददायक वातावरण निर्माण झाले आहे.*

## पाचवी, आठवीसाठी अधिसूचना जारी

**मुंबई : प्रतिनिधी**

इयत्ता पाचवी आणि आठवीच्या विद्यार्थ्यांना पुढील वर्गात प्रवेश मिळविण्यासाठी वार्षिक परीक्षेत उत्तीर्ण व्हावे लागणार आहे. राज्य सरकारने याबाबतची अधिसूचना जारी केली आहे. याआधी पाचवी आणि आठवीच्या विद्यार्थ्यांना वार्षिक परीक्षेत उत्तीर्ण होणे बंधनकारक नव्हते.

राज्यात शालेय शिक्षणासाठी मोठा निर्णय घेण्यात आला आहे. शालेय शिक्षण विभागाने शिक्षण हक्क कायदा २०११मध्ये सुधारणा केली आहे. त्यानुसार पाचवी आणि आठवी वार्षिक परीक्षेत विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्यास पुनर्परीक्षेचा पर्याय विद्यार्थ्याला देण्यात आला आहे. पुनर्परीक्षेतही विद्यार्थ्यांना अनुत्तीर्ण झाल्यास पाचवी आणि आठवी वर्गातच त्या विद्यार्थ्याला ठेवले जाणार असल्याचे शालेय शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे.

# माथेरान रोप वेचा मार्ग मोकळा

### सर्व परवानग्या मिळविण्यात कंपनीला यश

**कर्जत : प्रतिनिधी**

केंद्र सरकारने या वर्षी अर्थसंकल्पात पर्वतमाला योजनेतून महाराष्ट्रातील चार ठिकाणी रोप वे प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी सरकारने एक हजार कोटींची तरतूददेखील केली आहे. यात माथेरानचाही समावेश असून रोप वेसाठी आवश्यक असलेल्या सर्व परवानग्या घेण्यात कंपनीला यश आले आहे. त्यामुळे येत्या काळात माथेरानच्या विकासाला चालना मिळणार आहे.

माथेरान हे शंभर टक्के पर्यटनावर आधारित पर्यटनस्थळ असून येथे कोणत्याही प्रकारची शेती आणि औद्योगिक वसाहत नाही. त्यामुळे माथेरान येथील पर्यटनस्थळ जिवंत ठेवण्यासाठी पर्यटक मोठ्या प्रमाणात आले पाहिजेत. त्यासाठी अधिक प्रमाणात दळणवळणाची साधने उपलब्ध होणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने माथेरानमध्ये येण्यासाठी पर्यायी मार्ग असले पाहिजेत आणि त्यात रोप वे हा महत्त्वाचा प्रकल्प आहे. मुंबईपासून जवळ असलेल्या या पर्यटनस्थळी पर्यटकांना येण्यासाठी पर्यायी मार्ग म्हणून रोपवे असावा या दृष्टीने माथेरान रोप वे कंपनीकडून प्रयत्न केले आहेत.



केंद्र सरकार उभारणार असलेला माथेरान रोप वे पाच किमी लांबीचा असणार आहे. कर्जत तालुक्यातील भुतिवली येथे त्याचे पाहिले स्टेशन असणार आहे, तर दुसरे स्टेशन गारबेट माळावर आणि शेवटचे स्टेशन माथेरान येथील माधवजी गार्डन येथे असणार आहे. माधवजी गार्डन हे माथेरानमधील मध्यवर्ती ठिकाण समजले जाते. हा प्रकल्प माथेरानमधील पर्यटन व्यवसायात अमूलाग्र बदल घडविणारा असल्याने या प्रकल्पासाठी येथील व्यावसायिक आणि स्थानिक आग्रही आहेत.

# उद्धव ठाकरे यांची बालबुद्धी!

## ■ उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा पलटवार

**मुंबई : प्रतिनिधी**

पाटणा येथे विरोधकांच्या झालेल्या बैठकीत ठाकरे गटाचे नेते उद्धव ठाकरे यांनी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर हल्लाबोल केला. याला आता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी जोरदार प्रत्युत्तर दिले आहे.





उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मुख्यमंत्रिपदी राहिलेल्या माणसाला इतकी 'बालबुद्धी' असावी, याचे मात्र आश्चर्य वाटते. त्यामुळे त्याची फार चिंता तुम्ही करू नका, असे म्हणत फडणवीसांनी निशाणा साधला आहे. मुंबईला कुणी लुटले, मृतांच्या टाळूवरील लोणी कुणी खाल्ले, मराठी माणसाला कुणी ओरबाडले? १०० कोटींच्या वसुलीचे टार्गेट कसे दिले जाते? याची चिंता करा असे म्हटले आहे, तसेच तुमची हास्यजत्रा चालू द्या... बघूच आता शवासन कुणाला करावे लागते ते असे म्हणत टीकास्त्र सोडले आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या ट्विटर अकाऊंटवरून याबाबत ट्विट केले आहे.

मी, माझे कुटुंब आणि माझा संपूर्ण भाजप परिवार एक खुली किताब आहे उद्धव ठाकरे! ज्या 'व्हॉटसअ‍ॅप चॅट' बाबत तुम्ही बोलताय, ते आरोपपत्राचे भाग आहेत. न्यायालयाच्या रेकॉर्डवर आहेत आणि जाणीवपूर्वक टाकले आहेत, कारण, लपविण्यासारखे आमच्याकडे काहीच नाही, पण मुख्यमंत्रिपदी राहिलेल्या माणसाला इतकी 'बालबुद्धी' असावी, याचे मात्र आश्चर्य वाटते. त्यामुळे त्याची फार चिंता तुम्ही करू नका.

मृतांच्या टाळूवरील लोणी कुणी खाल्ले? चिंता करायचीच असेल आणि पुस्तक काढायचेच असेल तर सामान्य शिवसैनिकांना वाऱ्यावर सोडून मुख्यमंत्रिपद, मंत्रिपद घरात कसे ठेवले? मुंबईला कुणी लुटले यावर? मृतांच्या टाळूवरील लोणी कुणी खाल्ले यावर? मराठी माणसाला कुणी ओरबाडले? १०० कोटींच्या वसुलीचे टार्गेट कसे दिले जाते, यावर तुम्ही चिंता करा.

तुमचे हिंदुत्त्व आणि तुमचे कारनामे आता एकेक करीत जनतेत उघड होतच आहेत आणि होतच राहणार. आम्ही कुणाच्या घरात घुसत नाही, पण घुसलोच तर त्यांना तोंड दाखवायला जागा उरणार नाही. तुमचे 'नड्डे' केव्हा सैल होतील, हे समजणारदेखील नाही, (नड्डे म्हणजे घसा) तोवर तुमची हास्यजत्रा चालूद्या, बघूच आता शवासन कुणाला करावे लागते, ते असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

## मध्य रेल्वेकडून गणेशोत्सवात कोकणासाठी १५६ विशेष गाड्या

**रोहे : प्रतिनिधी**

गणेशोत्सव कोकणवासियांचा सर्वात मोठा उत्सव समजला जातो. या उत्सवासाठी मोठ्या प्रमाणात चाकरमनी आपल्या गावी जात असतात. त्या चाकरमानांसाठी मध्ये रेल्वे दरवर्षी विशेष गाड्या सोडतात. यानुसारच सप्टेंबर-२०२३च्या गणपती उत्सवासाठी मध्य रेल्वे १५६ गणपती विशेष गाड्या चालवणार आहे.

या गाड्यांमध्ये मुंबई-सावंतवाडी रोड स्पेशल (४० सेवा), टर्मिनस मुंबई येथून १३ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर (२० फेऱ्या) दररोज १२.२० वाजता सुटेल आणि त्याच दिवशी २.२० वाजता सावंतवाडी रोड येथे पोहचेल. सावंतवाडीवरून १३ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर (२० फेऱ्या) दररोज ३.१० वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी ४.३५ वाजता छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथे पोहचेल. लोकमान्य टिळक टर्मिनस-कुडाळ-लोकमान्य टिळक टर्मिनस विशेष (२४ सेवा) एलटीटीवरून १३, १४, १९, २०, २१, २४, २५, २६, २७, २८ सप्टेंबर आणि १ व २ ऑक्टोबर (१२ फेऱ्या) रोजी १०.१५ वाजता सुटेल आणि कुडाळला दुसऱ्या दिवशी ९.३० वाजता पोहचेल. कुडाळ येथून १४, १५, २०, २१, २२, २५, २६, २७, २८, २९ सप्टेंबर आणि २ व ३ ऑक्टोबरला १०.३० वाजता सुटेल (१२ फेऱ्या) त्याच दिवशी ११.५५ वाजता एलटीटीला पोहचेल.

पुणे-करमाळी/कुडाळ-पुणे विशेष (६ सेवा) १५, २२ आणि २९ सप्टेंबरला पुण्याहून ६.४५ वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी १० वाजता कुडाळला पोहचेल. कुडाळहून १७, २४ आणि १ ऑक्टोबरला ४.०५ वाजता सुटेल आणि पुण्याहून दुसऱ्या दिवशी ५.५० वाजता पोहचेल. करमाळी-पनवेल-कुडाळ विशेष (साप्ताहिक) १६, २३ आणि ३० सप्टेंबर (३ फेऱ्या) रोजी करमाळी येथून २.५० वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी २.४५ वाजता पनवेलला पोहचेल. पनवेलहून १७, २४ सप्टेंबर आणि १ ऑक्टोबर (३ फेऱ्या) रोजी ५ वाजता सुटेल आणि त्याच दिवशी १४ वाजता कुडाळला पोहोचेल.

दिवा-रत्नागिरी मेमू स्पेशल (४० सेवा) दिवा येथून १३ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर (२० फेऱ्या) ७.१० वाजता सुटेल आणि त्याच दिवशी २.५५ वाजता रत्नागिरीला पोहचेल. १३ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर (२० फेऱ्या) दरम्यान ३.४० वाजता रत्नागिरीहून सुटेल आणि त्याच दिवशी १०.४० वाजता दिवा येथे पोहचेल. मुंबई-मडगाव विशेष साप्ताहिक ४० सेवा छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून १३ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर (२० फेऱ्या)पर्यंत दररोज ११.५० वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी २.१० वाजता मडगावला पोहचेल. मडगावहून १३ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर (२० फेऱ्या) दररोज ३.१५ वाजता सुटेल आणि त्याच दिवशी ५.०५ वाजता छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबईला पोहचेल.

आरक्षण सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि www.irctc.co.in या वेबसाईटवर विशेष शुल्क आकारून सर्व गणपती स्पेशलसाठी बुकिंग २७ जून रोजी सुरू होणार आहे.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात करिअर मार्गदर्शन

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात शुक्रवारी (दि. २३) करियर गायडन्स, प्लेसमेंट सेल व अ‍ॅक्सिस बँक खारघर यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील वाणिज्य शाखेतील तृतीय वर्षाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी करिअर मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

या सत्रासाठी अ‍ॅक्सिस बँकेचे पदाधिकारी श्री प्रथमेश शेडगे व राज जाधव यांनी विद्यार्थी व विद्यार्थिनींना अ‍ॅक्सिस बँकिंग बँकेमध्ये असलेल्या संधी तसेच निवड प्रक्रिया याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले व काही विद्यार्थ्यांचे विद्यार्थ्यांचे पहिल्या फेरीसाठी निवड केली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी या करियर सत्रासाठी महाविद्यालयातील वाणिज्य शाखेतील तृतीय वर्षाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले व सत्रासाठी शुभेच्छा दिल्या.

या करिअर मार्गदर्शन सत्राचे आयोजन प्रा. रेवन शिंदे (समन्वयक प्लेसमेंट सेल व करिअर गायडन्स समिती) यांनी केले तसेच प्रा. महेश धायगुडे, प्रा. प्रथमेश ठाकूर व प्रा. नम्रता पारीक तसेच प्रा. रूपाली नागरेकर यांनी सहकार्य केले.




## माणगाव पोलीस ठाण्याचा भर पावसात रुट मार्च



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव पोलीस ठाण्यातर्फे पोलीस ठाणे हद्दीत येणांऱ्या सणानिमित्त शनिवारी (दि. २४) भर पावसात रुट मार्च काढण्यात आला.

आषाढी एकादशी व बकरी ईद सणाचे अनुषंगाने माणगाव पोलीस ठाणे ते कचेरी रोड-माणगाव बसस्थानकापर्यंत रुट मार्च काढण्यात आला. हा रुट मार्च उपविभागीय पोलिस अधिकारी पोंदकुले, राजेंद्र पाटील पोलीस निरीक्षक माणगाव यांचे मार्गदर्शनाखाली काढण्यात आला.

यामध्ये माणगाव पोलीस ठाण्यातील चार अधिकारी, १० अंमलदार व आरसीपी प्लाटून माणगाव हे सहभागी झाले होते.

## पान १ वरुन

### लोकनेते स्व. दि. बा. पाटील यांची संघर्षगाथा संग्रहालयातून साकारणार

पनवेल उरण आगरी समाज मंडळाचे अध्यक्ष अतुल पाटील, उपाध्यक्ष जे. डी. तांडेल, भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, उद्योजक जे. एम. म्हात्रे, गुलाब वझे, दीपक म्हात्रे यांच्यासह पदाधिकारी, अधिकारी उपस्थित होते.

लोकनेते दि. बा. पाटील यांनी जनतेच्या भल्यासाठी सर्वस्व अर्पण केले. त्यांचे महाराष्ट्रासाठी फार मोठे योगदान आहे. ते लक्षात घेता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार 'दिबां'ची संघर्षगाथा संग्रहालयाच्या माध्यमातून पनवेलमध्ये मांडण्यात येणार आहे, असे मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी सांगितले.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामध्ये विविध नोकऱ्या उपलब्ध होणार आहेत. त्या मिळणे स्थानिकांचा हक्क आहे. त्यासाठी येथे ३० दिवसांच्या आत स्कील सेंटर उभे करू, असे सांगून राज्यात नवे सरकार आल्यानंतर सातशेपेक्षा जास्त रोजगार मेळावे महाराष्ट्रात आयोजित करण्यात आले. आज पनवेलमध्ये मेळावा होत आहे. येथे बेरोजगार उमेदवारांना नोकरी-रोजगारासाठी महसूल अधिकारी सर्व माहिती देतील. शिक्षण घेतल्यानंतर तुम्हाला नोकरी करायची असेल किंवा स्वयंरोजगारासाठी कर्ज हवे असेल तर आमची जबाबदारी आहे की त्यासाठी योग्य मार्गदर्शन करून तुम्हाला ते मिळवून देणे. या मेळाव्यानंतरही तुम्हाला जे काही सहकार्य हवे असेल ते आमचे दोन्ही आमदार प्रशांत ठाकूर आणि महेश बालदी करतील, असे मंत्री मंगलप्रभात लोढा म्हणाले.

लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला देण्यात यावे यासाठी लढा उभारण्यात आला होता. त्या अंतर्गत झालेल्या आंदोलनांमध्ये सहभागी लोकांवर दाखल गुन्हे मागे घेण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीत मीही आहे. हे गुन्हे मागे घेण्यासाठी प्रयत्न करू, असे मंत्री लोढा म्हणाले.

सर्वपक्षीय कृती समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील यांनी, लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला देण्यात यावे यासाठी उभारण्यात आलेल्या आंदोलनात सहभागी लोकांवर जे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत ते मागे घेण्यात यावेत, अशी मागणी केली.

सर्वपक्षीय कृती समितीचे कार्याध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, लोकनेते दि. बा. पाटील यांचे योगदान कुणीही विसरू शकत नाही. त्यांनी शेतकरी, प्रकल्पग्रस्त, सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडविले. जनतेचे हक्क अबाधित राहिले पाहिजेत, त्यांची प्रगती झाली पाहिजे यासाठी वेळोवेळी आवाज उठविला. लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव नवी मुंबई विमानतळाला देण्यात यावे याकरिता समस्त भूमिपुत्रांनी ऐतिहासिक लढा दिला आणि त्याला यश येऊन या विमानतळाला राज्य सरकारने 'दिबां'चे नाव देण्याचे जाहीर केलेले आहे. आता समितीमार्फत केंद्र सरकारकडे पाठपुरावा करण्यात येणार आहे.

नवी मुंबई विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव जाहीर केल्याबद्दल आमदार महेश बालदी यांनी राज्य सरकारचे आभार मानले. कृती समितीचे सल्लागार व माजी मंत्री जगन्नाथ पाटील यांनीही विचार व्यक्त करून महारोजगार मेळाव्यास उपस्थित तरुणांना शुभेच्छा दिल्या. जे. डी. तांडेल यांनी सर्वांचे आभार मानले.

या महारोजगार मेळाव्याच्या माध्यमातून विविध ३८ कंपन्यांकडून दोन हजार ३९९ रिक्त पदांसाठी उमेदवारांची मागणी नोंदविण्यात आली होती, तर या मेळाव्यास ६५१ बेरोजगार युवकांनी नावे नोंदविली होती. मुलाखत एक हजार १२४ जणांनी दिली आणि एकूण २७२ जणांची प्राथमिक निवड करण्यात आली, अशी माहिती जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राच्या सहाय्यक आयुक्त अमिता पवार यांनी दिली.

### पाच लाखांपेक्षा जास्त ठेवी असणाऱ्यांना कधी परतावा मिळणार?

केंद्र सरकारने नवीन कायदा मंजूर केला. रिझर्व्ह बँकेने कर्नाळा बँकेचा व्यवसाय परवाना 'बँकिंग बिझनेस इन इंडिया अंडर रेग्युरेशन २२ सेक्शन ५६, रेग्युरेशन अ‍ॅक्ट १९४९'नुसार रद्द करीत असल्याची अधिसूचना जारी केली. केंद्र सरकारने केलेल्या नवीन कायद्यामुळे कर्नाळा बँकेत पाच लाखापर्यंतच्या ठेवी रिझर्व्ह बँक ठेवी विमा संरक्षण व क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशनच्या नव्या नियमानुसार ठेवीदारांना परत मिळाल्या. पाच लाखांपेक्षा कमी रकमेचे ४९ हजार ४२३ ठेवीदार होते. त्यांचे २४० कोटी रुपये केंद्र सरकारच्या निर्णयांनुसार विमा संरक्षणाच्या माध्यमातून परत मिळाले. त्या वेळीही शेकापने लोकांचे पैसे आम्ही परत देतोय असा संदेश प्रसारित करून लोकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला होता.

पाच लाखांपेक्षा जास्त रक्कम असलेले २२५१ ठेवीदार असून त्यांची २९४ कोटी रुपयांची ठेव आहे. ती मिळवण्यासाठी संचालकांची मालमत्ता केवळ जप्त करून भागणार नाही, तर ती विकून पैसा मिळवणे गरजेचे आहे. संचालकांची मालमत्ता विकून येणारी रक्कम नियमाप्रमाणे प्रथम क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशनला दिली जाईल. त्यानंतर उरलेली रक्कम या ठेवीदारांना मिळणार आहे. अद्याप सर्व संचालकांची मालमत्ता जप्त करण्यात आलेली नाही. जप्त केली आहे तिचा लिलाव केलेला नाही. आतापर्यंत गुन्हा दाखल असलेल्यांपैकी फक्त तिघांनाच अटक झाली आहे. या प्रकरणात आपल्याला अटक होऊ नये यासाठी बँकेचे संचालक अभिजित विवेक पाटील यांनी अटकपूर्व जामीन अर्ज व अपर्णा वडके यांचा नियमित जामीन अर्ज दाखल केला होता. या वेळी सरकारी वकील वाय. एस. भोपी यांनी कर्नाळा बँकेची आदर्श बँक म्हणून करण्यात येणारी त्या वेळची जाहिरात सांगून 'आदर्श बँक कर्नाळा, मात्र आरबीआय सांगते, नको ही बँक कर्नाळा' असे नमूद करीत बँकेचा इतिहास न्यायालयाला कथन करून बँकेच्या कारभारात अभिजीत पाटील यांचा कसा सहभाग होता याची माहिती दिली. इतिवृतावर व कर्ज मंजूर प्रकरणावर असलेल्या सह्या अभिजीत पाटील यांच्याच असल्याचा हस्ताक्षर तज्ज्ञांचा अहवाल न्यायालयाला सादर केला होता, तर अपर्णा वडके यांनी लिपिक म्हणून बँकेत नोकरीची सुरुवात केली. व्हीआरएस घेताना त्या सीईओ होत्या. म्हणजे त्यांना बँकेच्या कामकाजाची चांगली माहिती होती. त्यांच्या खात्यात संबंधित कर्मचाऱ्याच्या खात्यातून पैसे आल्याची नोंद आहे. त्यामुळे त्यांचा सहभाग दाखवून दिल्याने दोघांचे अर्ज फेटाळण्यात आले

यानंतर आता माजी सीईओ हेमंत सुताने यांना अटक करण्यात आली आहे. पोलिसांची कारवाई अत्यंत संथपणने सुरू आहे. संचालकांच्या मालमत्ता जप्त कधी करणार? त्यांचा लिलाव कधी होणार, असा प्रश्न ठेवीदारांना पडला असताना शेकापचे नेते मात्र तुरुगात असणाऱ्या आपल्या नेत्याचा वाढदिवस मोठ्या उत्सवात साजरा करताना दिसत आहेत. आपला नेता तुरूंगात असल्याचा त्यांना विसर पडलेला दिसत होता.

पनवेलच्या न्यायालयात अभिजीत पाटील यांच्या अटकपूर्व जामीन अर्जावर सुनावणी सुरू असताना पाच लाखांपेक्षा जास्त रक्कम असलेले ठेवीदार तिन्ही दिवस गर्दी करून दोन-दोन तास उभे राहून युक्तिवाद ऐकत होते. त्यामध्ये अनेक ज्येष्ठ नागरिक होते. त्यांच्या डोळ्यांतील अश्रू या शेकाप नेत्यांनी पहायला हवे होते. कर्नाळा नागरी सहकारी बँकेत शेकापच्या नेत्यांनी सहकारापेक्षा स्वाहाकाराला महत्त्व दिले. यामुळे अनेकांचे प्राण गेले, कित्येक कुटुंबे देशोधडीला लागली. ग्रामपंचायतींचे खातेही कर्नाळा बँकेत असल्याने या गावातील मूलभूत समस्याही सोडवणे आज शक्य होत नाही. त्याचे दूरगामी परिणाम सर्वांना भोगावे लागत आहेत.

## नवी मुंबई व रायगड जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मिस्तु केम प्लास्ट लिमिटेड खोपोलीचे व्यवस्थापकीय संचालक संजय मावजी डेढिया आणि नवी मुंबई स्पोर्ट्स व सामाजिक विकास मंडळ याच्या संयुक्त विद्यमाने नवी मुंबई व रायगड जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

शनिवार (दि. १ जुलै) ते रविवार (दि. २ जुलै) या कालावधीत नवीन पनवेल सेक्टर १८ सिडको समाज मंदिर येथे महाराष्ट्र शासनाचा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार विजेते व रायगड जिल्हा टेबल टेनिस असोसिएशनचे अध्यक्ष संजय सुदाम कडू यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा होईल. स्पर्धेचे उद्घाटन सिडकोचे सह व्यवस्थापकीय संचालक कैलास शिंदे याच्या हस्ते होणार आहे. या वेळी इ. दहावी व बारावी तसेच डीग्री उत्तीर्ण झालेल्या टेबल टेनिस खेळाडूंचा सत्कार करण्यांत येणार आहे.



स्पर्धेचा बक्षिस वितरण समारंभ २ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजता मिस्तु केम प्लास्ट लिमीटेड खोपोलीचे व्यवस्थापकीय संचालक संजय मावजी डेढिया यांच्या हस्ते करण्यांत येणार आहे.

**स्पर्धा या गटांत होणार**

**बीगनर्स मुली व मुले**

- ११ वर्षांखालील मुली व मुले
- १३ वर्षांखालील मुली व मुले
- १५ वर्षांखालील मुली व मुले
- १७ वर्षांखालील मुली व मुले
- १९ वर्षांखालील मुली व मुले
- महिला व पुरूष
- व्हेटरन्स पुरूष
- पुरुष डबल्स

स्पर्धेचे चीफ रेफरी डी. आर. साळसकर व असिस्टंट चीफ रेफ्री पराग अंकोलेकर हे काम पहाणार आहेत तर हॉलची व्यवस्था टेबल टेनिस प्रशिक्षक अक्षर भाटी व शामल डेब्बार्मा यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

## महिलांसाठी स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यशाळा

**पनवेल : वार्ताहर**

दृष्टी फाऊंडेशन व सारण्या प्रतिष्ठाण संस्थेच्या वतीने १ ते ७ जुलै या कालावधीत केवळ मुली व महिलांसाठी विनामूल्य स्वयंसंरक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

खांदा कॉलनी सेक्टर १० येथील एसजीडी पब्लिक स्कूल येथे प्रशिक्षण होईल. या कार्यशाळेत महिलांना कराटे आणि लाठी काठी तसेच रोजच्या व्यवहारात उपयोगी पडतील अशा स्वसंरक्षणाच्या क्लृप्त्या आणि डावपेच शिकवले जाणार आहेत. हे शिबिर १० ते ५० वयोगटातील मुली, गृहिणी, व्यावसायिक, तसेच नोकरदार महिला आणि कॉलेज युवतींकरिता उपयुक्त आहे.

बुधवारी (दि. २८)पर्यंत दिलेल्या पत्त्यावर येऊन अर्ज भरणे आवश्यक आहे. या कार्यशाळेबाबत अधिक माहितीसाठी यांना (९८९२०४५७४५/८६९१८८६३३९) वर संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सध्याच्या काळात वाढते अत्याचार, बलात्काराच्या घटनांच्या पार्श्वभूमिवर परिसरातील मुली व महिलांनी या कार्यशाळेत सहभागी होण्याचे आवाहन दृष्टी फाउंडेशनचे अध्यक्ष किशोर देवधेकर यांच्याकडून करण्यात येत आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत जमीन मालक **श्री. हाशा रामा बरवे,** रा. लोणिवली, ता. पनवेल, जि. रायगड यांजकडून सदर मिळकत विकत घेण्याच्या विचारात आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे - लोणिवली, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड**

| गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १६ | ५ | ०-०६-१०<br>पो.ख. ०-०१-००<br>एकूण ०-०७-१० | ०.४७ |

तरी सदरहू मिळकतीवर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, वा तत्सम कोणतेही दावे मालकी वा अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी. व सदर मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

**पनवेल.**
**दि. २४/०६/२०२३.**

**सही/-**
**अ‍ॅड. शरद के. राणे**
कार्यालय : शॉप नं. १२३, म्युनिसिपल शॉपिंग कॉम्प्लेक्स, पहिला मजला,भाजी मार्केटजवळ, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड. ४१०२०६, मो. ९८१९८६९२१२

## निवडक

### अपघातात मुख्याध्यापिकेचा मृत्यू

**पनवेल :** पळस्पे फाट्याजवळ शाळेत चाललेल्या मुख्याध्यापिकेच्या दुचाकी वाहनाला झालेल्या अपघातात



त्यात त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना शनिवारी (दि. २४) सकाळी घडली आहे. पनवेल येथे जिल्हा परिषदेच्या गिरवले शाळेच्या शिक्षिका ललिता ओंबळे मुख्याध्यापिका ललिता ओंबळे या शनिवारी सकाळी त्यांच्या दुचाकीवरून पळस्पेजवळील गिरवले गावात असलेल्या शाळेमध्ये जात होत्या. पळस्पे ब्रिजच्या पुढे चर्चच्या समोरील बाजूस एका अज्ञात वाहनांची धडक त्याच्या दुचाकीस बसून त्यात त्यांचा तोल गेला. त्या रस्त्यावर पडल्या आणि एकेरी मार्गावरून भरधाव येणाऱ्या कंटेनरचे चाक त्यांच्या डोक्यावरून गेले, त्यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली असून फरार वाहनचालकाचा शोध सुरू आहे.

### नियम मोडणाऱ्या रिक्षाचालकांवर कारवाई

**पनवेल :** शहर वाहतूक विभागाच्या पोलिसांनी मागील नऊ दिवसांपासून साध्या वेशात बनावट प्रवासी बनून मीटरप्रमाणे रिक्षा व्यवसाय न करणाऱ्या १२ चालकांवर कारवाई केली आहे. पोलीस उपायुक्त तिरुपती काकडे यांच्याकडे तीन आसनी रिक्षाचालकांचा मीटर डाऊन होत नसल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या, परंतु प्रवाशांची लेखी तक्रार नसल्याने वाहतूक पोलिसांनी या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी उपायुक्त काकडे यांनी पोलीस निरीक्षक संजय नाळे यांना साध्या वेशातील पोलीस पाठवून कारवाई करण्याचे आदेश दिले होते. याप्रमाणे १३ जूनला पाच आणि २२ जूनला सात तीन आसनी रिक्षाचालक मीटरप्रमाणे भाडे आकारत नसल्याचे पोलीस कर्मचाऱ्यांना दिसले. ही कारवाई पनवेल विविध रिक्षा शहराच्या थांब्याजवळ करण्यात आली.

### वाहनचालकाची फसवणूक, मुद्देमाल लंपास

**पनवेल :** शहरामध्ये भामट्यांच्या दुकलीने बोलण्यात गुंतवून एका वाहनचालकाची फसवणूक करून वाहनातून तब्बल एक लाख ६० हजारांचा मुद्देमाल लंपास केला आहे. ही घटना लाइफलाइन रुग्णालयासमोरील रस्त्यावर घडली. संबंधित वाहनचालक कळंबोलीतील सेक्टर २० मध्ये राहतात. मोटारीतून पीडित चालक जात असताना दोन अनोळखी व्यक्तींनी पैशांची नोट मोटारीच्या मागील चाकालगत पडल्याचे सांगितले. त्यामुळे संबंधित पैशांची नोट उचलण्यासाठी मोटारचालक उतरल्यावर दुसऱ्या भामट्याने मोटारीतील बॅग लंपास केली. या बॅगमध्ये एक लाख २० हजारांची रोकड आणि महत्त्वाची कागदपत्रे होती. याबाबत शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळातर्फे वह्यावाटप





## विद्यार्थ्यांसाठी स्तुत्य उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळा तोंडरे येथे श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने शनिवारी (दि. २४) विद्यार्थ्यांना वह्यांचे मोफत वाटप करण्यात आले.

सालाबादप्रमाणे याही वर्षी श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, पनवेल यांच्यामार्फत शाळेतील साधारण ५०० मुलांना मोफत वह्यांचे वाटप मान्यवरांच्या उपस्थित करण्यात आले. तोंडरेच्या माजी उपसरपंच अमृता पाटील यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने इयत्ता पहिली ते आठवीमधील प्रथम क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांना स्कूल बॅग देऊन त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

या कार्यक्रमास युवा नेते दिनेश खानावकर, माजी सरपंच अशोक पाटील, वासुदेव पाटील, शाळा समिती अध्यक्ष धनाजी पाटील, उपाध्यक्ष प्रमिला भोपी, सदस्य लक्ष्मण पाटील, तसेच श्रीनाथ पाटील, वासुदेव पाटील अमृता पाटील, मनीषा पाटील, सुगंधा पाटील, मेघा पाटील, सविता पाटील, वैशाली पाटील, पूजा पाटील, सुनीता पाटील आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत मुख्याध्यापक राजेश मोकल यांनी केले व कार्यक्रमाचे सर्व सूत्रसंचालन राजेंद्र खामकर यांनी केले व शेवटी सर्वांचे आभार वसंत मोकल यांनी मानले.





**कळंबोली : श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने सुधागड विद्या संकुलासह महाराष्ट्र स्कूलमध्ये वह्यांचे मोफतवाटप करण्यात आले. या वेळी भाजप कळंबोली अध्यक्ष रविनाथ पाटील, माजी सभापती अमर पाटील, प्रमिला पाटील, सरचिटणीस दिलीप बिष्ट, युवा नेते संदीप म्हात्रे, उपाध्यक्ष संदीप भगत, विनोद बोरसे, सुनील ढेंबरे, प्रभाग अध्यक्ष रामा महानवर, प्रकाश शेलार, उत्तर भारतीय अध्यक्ष केशव यादव, महिला मोर्चा अध्यक्ष मनीषा निकम, सरचिटणीस दुर्गा सहानी, महिला पदाधिकारी स्वेता नागरले, नीता अधिकारी, युवा मोर्चा गौरव नाईक, भूषण जले, विकी देशमुख आदी उपस्थित होते.**

## वहाळचे उपसरपंच अमर म्हात्रेंवर प्राणघातक हल्ला

### अन्य दोघांनाही मारहाण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे यांच्यासह अन्य दोघांवर प्राणघातक हल्ल्याची घटना शुक्रवारी (दि. २३) रात्रीच्या सुमारास घडली. उलवे सेक्टर १९मधील भाजप कार्यालयाजवळ तोंडावर रूमाल बांधून आलेल्या अज्ञात मारेकऱ्यांनी उपसरपंच, एक सदस्य आणि अन्य एकावर लोखंडी रॉड आणि गुप्तीसारख्या धारधार शस्त्राने प्राणघातक हल्ला केला. यात ते गंभीर जखमी झाले आहेत.



वहाळचे उपसरपंच अमर म्हात्रे, सदस्य वितेश म्हात्रे तसेच अश्विन नाईक हे उलवे सेक्टर १९ येथील भाजप कार्यालयात बसले असताना तोंडावर मास्क लावून मोटरसायकलवर आलेल्या अज्ञात चार ते पाच गुंडांनी लोखंडी रॉड आणि गुप्तीने भ्याड हल्ला केला. यात अमर म्हात्रे यांच्या डोक्यावर फटका बसल्याने गंभीर दुखापत झाली आहे, तर वितेश म्हात्रे आणि अश्विन नाईक यांच्यावर लोखंडी रॉडने हल्ला करून हल्लेखोर पसार झाले.

या घटनेमुळे उलवे नोडमध्ये दहशत पसरली आहे. याबाबत पोलीस घटनास्थळी पोहचले व त्यांनी तत्काळ तपास सुरू केला आहे.

## महाजनसंपर्क अभियानांतर्गत कळंबोलीत व्यापारी संमेलन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशाचे कार्यकुशल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारला नऊ वर्ष पूर्ण झाली आहेत. या काळात देश विकासाची मोठी पावले उचलतानाच जागतिक स्तरावर भारताची मन उंचाविण्याचे काम पंतप्रधान मोदींनी केले आहे. त्यानुषंगाने योजना, विकास कामे, निर्णयांची माहिती जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी भाजपतर्फे मोदी @ ९ महाजनसंपर्क अभियानांतर्गत शुक्रवारी (दि. २३) व्यापारी संमेलन आयोजित करण्यात आले होते. कळंबोली येथील सुधागड एज्युकेशन विद्यालयात भाजपचे रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झाला.

या वेळी म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, रायगड लोकसभा विस्तार सरचिटणीस अविनाश कोळी, उत्तर रायगड संघटक सरचिटणीस दीपक बेहेरे, जिल्हा सरचिणीस नितीन पाटील, युवा मोर्चा जिल्हा अध्यक्ष मयुरेश नेटकर, कळंबोली शहर अध्यक्ष राविनाथ पाटील, माजी नगरसेवक रामजी बेरा, एकनाथ गायकवाड, राजू सोनी, अमर पाटील, राजू शर्मा, उरण शहर अध्यक्ष कौशिक शहा, कमल कोठारी, अनिल भगत, बबन मुकादम, व्यापारी संस्थेचे उपाध्यक्ष विनोद बोरसे, नाना मुकादम, संजय जैन, अंबालाल पटेल, पनवेल व्यापारी अध्यक्ष नारायण ठाकूर, विनोद बाफना, कानजी भैया, वालजी सिरती, संजय कावडिया, विनोद जैन, अमरचंद चौधरी, टेकचंद चौधरी आदी उपस्थित होते.

## डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जींना अभिवादन



**खारघर : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पार्टी, खारघर मंडलाच्या वतीने भारताची एकता आणि अखंडता कायम राहावी यासाठी आपल्या प्राणांचे बलिदान देणारे जनसंघाचे संस्थापक डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या ७० व्या स्मृतीदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.

या वेळी खारघर मंडलाचे अध्यक्ष ब्रिजेश पटेल यांनी प्रतिमेला पुष्पहार घातला व माजी नगरसेवक शत्रुघ्न अंबाजी काकडे यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. सरचिटणीस दीपक शिंदे, माजी जिल्हा सरचिटणीस समीर कदम, रमेश मेहेंद्रु, यांनी श्यामाप्रसाद मुखर्जी यांचे एकंदरीत कार्य व देशाप्रती केलेला त्याग याबद्दल विचार प्रकट केले.

अध्यक्ष ब्रिजेश पटेल यांच्यासोबत माजी नगरसेवक शत्रुघ्न काकडे, सरचिटणीस दीपक शिंदे, सोशल मीडिया जिल्हा सहसंयोजक मोना अडवाणी, किरण पाटील, मंडल उपाध्यक्षा बिना गोगरी, अंजुबेन पटेल, सुशीला शर्मा, निर्मला यादव, स्मिता आचार्य, प्रो. संदीप रेड्डी, गझे सिंग शेरॉन, रमेश महेंद्रू, गिरीश गुप्ता, शैलेंद्र त्रिपाठी, अमर उपाध्याय, दिलीप जाधव, सर्जेराव मेंगाडे या वेळी उपस्थित होते.

## दिघाटी येथे विद्यार्थ्यांना दप्तराचे वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील दिघाटी येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत लायन ग्रुप महाराष्ट्र राज्य यांच्याकडून शाळेतील सर्व मुलांना मोफत दप्तर वाटप करण्यात आले.

या वेळी जितेंद्रभाई फडके, लायन ग्रूप अध्यक्ष रवी शेळके, उपाध्यक्ष तथा माजी नगरसेविका नीता माळी, ॲड. मनोज गाढवे, संदेश लहाने, मुख्याध्यापक गैरी पाटील, शिक्षक हर्षद गावंड, संदेश कोळी, आकाश पाटील, प्रतीक चोरगे, सरपंच रजनी हिरामण ठाकूर, ग्रामपंचायत सदस्य शितल पाटील, ग्रामपंचायत सदस्य लक्ष्मण ठाकूर, भाजपचे कार्यकर्ते विकास बारका पाटील, शाम पाटील, दिघाटी ग्रामपंचायत कर्मचारी रामभाऊ पाटील, केळवणे पंचायत समिती विभागीय युवा मोर्चा उपाध्यक्ष सुबोध ठाकूर, संदीप पाटील, सुशील भाऊ, चेतन गायकर, समाधान पाटील, जनार्दन पाटील, विलास भोईर, हनुमंत भोपी भोईर, नशीब भगत, रवींद्र फडके तसेच सर्व लायन ग्रुप उपस्थित होता.



## कळंबोलीत दाखले वाटप शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

शिव शंभो सामाजिक विकास मंडळ, रोडपाली आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, पनवेल व पनवेल तहसील कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने कळंबोलीतील सुधागड हायस्कूलमध्ये शनिवारी (दि. २४) दाखले वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



या कार्यक्रमाला भाजप कळंबोली अध्यक्ष रविनाथ पाटील, माजी सभापती अमर पाटील, प्रमिला पाटील, सरचिटणीस दिलीप बिष्ट, युवा नेते संदीप म्हात्रे, उपाध्यक्ष संदीप भगत, विनोद बोरसे, सुनील ढेंबरे, प्रभाग अध्यक्ष रामा महानवर, प्रकाश शेलार, उत्तर भारतीय अध्यक्ष केशव यादव, महिला मोर्चा अध्यक्ष मनीषा निकम, सरचिटणीस दुर्गा सहाणी, महिला पदाधिकरी स्वेता नागरले, नीता अधिकारी, युवा मोर्चा गौरव नाईक, भूषण जले, विकी देशमुख आदी उपस्थित होते.

दाखले वाटप शिबिराला अनेक नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

## जासई विद्यालयात ‘दिबां’ची पुण्यतिथी

**उरण : प्रतिनिधी**

रयत शिक्षण संस्थेच्या उरण तालुक्यातील जासई येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील ज्युनियर कॉलेज या शैक्षणिक संकुलात लोकनेते, शेतकऱ्यांचे भाग्यविधाते, गोरगरीब कष्टकरी आणि भूमिपूत्रांचे कैवारी, स्वर्गीय लोकनेते दि. बा. पाटील यांची दहावी पुण्यतिथी भक्तिभावाने झाली.

या वेळी विद्यालयाच्या प्रांगणात असलेल्या दि. बा. पाटील साहेबांच्या पूर्णाकृती भव्य पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून पूजन केले. त्याचबरोबर विद्यालयाच्या प्रांगणातील इतर महापुरुषांच्या पुतळ्यांचेही पूजन केले. दि. बा. पाटील साहेबांच्या जीवनावर विद्यालयात आयोजित केलेल्या विविध स्पर्धांतील बक्षीस पात्र विद्यार्थ्यांना शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष, भारतीय मजदूर संघाचे राष्ट्रीय महामंत्री, कामगार नेते सुरेश पाटील यांच्यामार्फत मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

दि. बा. पाटीलसाहेबांच्या जीवनावर विद्यालयातील विद्यार्थ्यांनी आणि प्रा. संदीप तोरणे यांनी आपले जाज्वल्य विचार मांडून सर्वांना मंत्रमुग्ध केले. महात्मा फुले सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना खाऊ आणि पाणी यांचे वाटप केले. या कार्यक्रमासाठी विद्यालयाचे चेअरमन अरुण जगे, नरेश घरत, सरपंच संतोष घरत, प्रभाकर मुंबईकर, सुभाष घरत, गोपीनाथ म्हात्रे, दीपक पाटील, बाबुराव मढवी, टी. टी. घरत टी. टी, पुष्पा म्हात्रे, यशवंत घरत, रघुनाथ ठाकूर, माणिक म्हात्रे, डी. आर. ठाकूर, जे. सी. घरत, पद्माकर घरत, धर्मा पाटील आदी उपस्थित होते.

विद्यालयाच्या उपमुख्याध्यापिका एस. एस. पाटील, पर्यवेक्षिका एस. सी. म्हात्रे, जुनियर कॉलेज विभाग प्रमुख एस. एस. शिंदे, रयत सेवक संघाचे महाराष्ट्र समन्वयक नुरा शेख, गुरुकुल प्रमुख एस. पी. ठाकरे आणि विद्यालयातील सर्व सेवक व विद्यार्थी वर्ग उपस्थित होते.




**उरण : तालुक्यातील जसखार गावातील आशीर्वाद स्वयंसहाय्यता समूह महिला बचत गटाचा प्रथम वर्धापन दिन समारंभ शुक्रवारी झाला. या वेळी अध्यक्ष रविता ठाकूर, सचिव श्रद्धा ठाकूर, खजिनदार किर्ती म्हात्रे, सदस्य भारती तांडेल, पुष्पा घरत, सुहानी म्हात्रे, देवयानी म्हात्रे, मिना ठाकूर, स्नेहल ठाकूर, संध्या पाटील, तृप्ती ठाकूर उपस्थित होत्या.**



# पब्लिक बोललं, पिक्चर आवडला नाही... शो खतम!

**पिक्चर हाऊसफुल्ल गर्दीत कधी चालतं? तिकीट काढून आलेल्या पब्लिकला ते भारी आवडलं की आणि एकदा का पब्लिकने पिक्चर डोक्यात व डोक्यावर घेतलं की फर्स्ट रनला ते जोरात चालतचं. पुढील पिढीत त्या यशाच्या गोष्टी जात असतात...आणि एकदा का पब्लिकने ठरवलं, कुछ दम नहीं, बोअर करती है की त्या पिक्चरची गर्दी अचानक गायब होते. अनेक वर्ष सुरू असलेला हा खेळ आहे.**

झूम प्रहर
दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक




ओम राऊत दिग्दर्शित 'आदिपुरुष'चे अपयश चहुबाजूने गाजतेय. पिक्चरचा पहिला शो सुरू असतानाच तो पाहता पाहताच सोशल मिडियात प्रतिकूल मते अशी आणि इतक्या वेगाने सुरु झाली की, पिक्चर न पाहणारेही व्यक्त होताहेत की काय वाटू लागले...

'आदिपुरुष' पडद्यावर आल्या आल्याच दाणकन पडला. सुरुवातीला हा पिक्चर पडल्याचा मोठा आवाज झाला, नंतर मात्र हा इतका व असा शांत झाला की तो मल्टीप्लेक्समध्ये सुरू आहे की नाही असा प्रश्न पडावा. जणू काही हा चित्रपट प्रदर्शित झालेल्या मल्टीप्लेक्सच्या आसपासही फिरकू नये असाच प्रेक्षकांनी निश्चय केला.

'पिक्चर पडण्याच्या गोष्टी नवीन नाहीत.' वर्षानुवर्षे मोठ मोठे चित्रपट आडवे होताहेत. मुळात प्रत्येक चित्रपट सुपर हिट होईलच अशी आशा बाळगणेही योग्य नाही, याचं महत्वाचे कारण म्हणजे कोणत्याही निर्मिती संस्था, निर्माते, दिग्दर्शक आणि स्टार यांचे सगळेच चित्रपट दर्जेदार असूच शकत नाही. ते शक्यही नाही. पिक्चर हमखास हिट होण्याची जडीबुटी नाही. काही चित्रपटांची थीम चांगली असते पण पटकथा फसते. हे दोन्ही जमले तर स्टारचा 'पडता काळ' असतो. तीनही गुण जमले तर चित्रपट प्रदर्शित होण्याची वेळ चुकीची असते. कधी सगळे जमते पण चित्रपटाचा निर्मिती खर्च भरमसाठ असतो.

'ट्यूबलाईट', 'ठग्ज ऑफ हिन्दुस्तान', 'झीरो', 'कलंक', 'लालसिंग चड्ढा' या सुपर फ्लॉप्स चित्रपटांपासून आपली चित्रपटसृष्टी खरंच काही शिकेल असे नाही. या चित्रपटातून झालेले नुकसान पुढील चित्रपटातून कसे भरून काढता येईल याचा हिशोब मात्र होईल. याचे कारण आता चित्रपटाच्या गुणवत्तेत निर्मिती खर्च आणि किती कोटीची कमाई हेच घटक मटक महत्वाचे झालेत. मोठ्या चित्रपटाच्या अपयशातील नुकसान छोट्या चित्रपटांच्या यशातून वसूल करण्याची व्यावसायिक खेळी केली जाते. हे पूर्वापार घडतेय, निर्माता आणि दिग्दर्शक बी. आर. चोप्रा यांनी दिलीपकुमारची दुहेरी भूमिका असलेला 'दास्तान' (१९७२) फ्लॉप होताच 'धुंद' (१९७३) या तुलनेत छोट्या चित्रपटाची निर्मिती केली. त्यापाठोपाठ दिग्दर्शक बासू चटर्जी यांना संधी देताच बासूदानी 'छोटीसी बात' (१९७५) हा चित्रपट निर्माण केला. या चित्रपटांना यश लाभल्याने बी. आर. फिल्मचे बॅनर सावरले.

गुरुदत्त दिग्दर्शित आणि अभिनित 'कागज के फूल' (१९६४) अपयशाने चित्रपट रसिक हळहळले. याचे कारण म्हणजे तो एका कसदार कलाकृतीचा पराभव होता. आजही या चित्रपटाची दखल घेतली जाते हा या चित्रपटाचा विजय आहे. राज कपूर दिग्दर्शित 'मेरा नाम जोकर' (१९७०) पडला की पाडला याचीही बरीच चर्चा झाली आणि सगळी सहानूभूती राज कपूरकडे गेली. दोन मध्यंतरने पडद्यावर आलेल्या जोकरची लांबी कमी करून तो एका मध्यंतरचा करण्यात आला, पण तोपर्यंत चित्रपट फ्लॉप म्हणून गणला गेला. या चित्रपटांची गाणी सर्वकालीन हिट असल्याने हे चित्रपट रिपिट रन (म्हणजे काही वर्षांनी पुन्हा रिलीज), मॅटीनी शो यांना आल्यावर त्यांना रसिकांची दाद मिळाली. पहिल्या रनला अपयशी ठरलेल्या चित्रपटाची रिपिट रनला पुन्हा जाहिरात करावी लागत नसली तरी आता आर्थिक यशाची गती मंदावलेली असते. रणधीर कपूरने एका मुलाखतीत 'जोकर'वर भाष्य करताना म्हटलं, हा चित्रपट आर. के. फिल्मचा सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट आहे. (याचाच अर्थ, रिपिट रनला 'जोकर'ला उत्तम प्रतिसाद मिळाला.) निर्माता, दिग्दर्शक, अभिनेता ओ. पी. रल्हन याच्या 'तलाश' (१९७१) अपयशाची गोष्टच वेगळी. 'एक कोटीचा चित्रपट' अशी याची जोरदार शोरदार पूर्वप्रसिध्दी झाली. पन्नास बावन्न वर्षांपूर्वी एक कोटी रुपये ही अक्षरशः प्रचंड मोठी रक्कम होती, पण हा चित्रपट पडद्यावर आल्या आल्या दाणकन पडला आणि राजेंद्रकुमारचा ज्युबिलीकुमारचा काळ मागे पडत गेला. काही मोठे चित्रपट आडवे होताना असेही काही घडले. रसिकांनी या चित्रपटावर कॉमेन्ट्स करताना म्हटले, रल्हनची श...राख. या चित्रपटाचे सचीन देव बर्मनचे संगीत श्रवणीय होते. 'दास्तान', 'तलाश' आणि आत्माराम दिग्दर्शित 'ये गुलिस्ता हमारा ' (देव आनंद हीरो) हे तीनही चित्रपट फ्लॉप ठरले तरी शर्मिला टागोरची मात्र दिलीपकुमार, राजेंद्रकुमार आणि देव आनंद अशा तीनही बड्या हिरोंची नायिका होण्याचे स्वप्न पूर्ण झाले. फ्लॉप चित्रपटही कोणाला तरी कसली तरी खुशी देत असतोच.

मोठ्ठे चित्रपट अपयशी ठरताना अवतीभवती अनेक गोष्टी घडतात. असित सेन दिग्दर्शित 'बैराग' (१९७४) मध्ये दिलीपकुमारची तिहेरी भूमिका होती. या अभिनय सम्राटाच्या दर्जाला साजेशा हा चित्रपट नव्हता. दिलीपकुमार पडद्यापेक्षाही मोठा झाला असे म्हटले गेले. 'बैराग'च्या अपयशाने दिलीपकुमारची नायक म्हणून सद्दी संपवली. लीना चंदावरकरला दिलीपकुमारची नायिका बनण्याची छान संधी मिळाली. हा झाला तिचा व्यक्तिगत आनंद, पण या दोघांतील वयातील अंतर पडदाभर दिसले आणि हंसे झाले त्याचे काय? दिल दिया दर्द लिया, लीडर, आदमी, संघर्ष या चित्रपटांच्या अपयशानेच दिलीपकुमारची घसरण सुरू झाली. मोठ्या स्टार्सचा मोठा चित्रपट अपयशी ठरणे मोठीच बातमी असते. हिट पिक्चरपेक्षा फ्लॉप पिक्चर कलरफुल गोष्टी जन्माला घालतो.


निर्माता आणि दिग्दर्शक राज खोसलाचा 'प्रेम कहानी' (१९७५) आणि शक्ती सामंता दिग्दर्शित 'मेहबूबा' (१९७६) या फ्लॉपनी राजेश खन्नाची क्रेझ ओसरलीय हे अधोरेखित केले. या दोन्ही चित्रपटांची गाणी आजही लोकप्रिय आहेत ना? कितीदाही ती गाणी ऐका/पहा, गुणगुणत रहा, अजिबात कंटाळा येत नाही. येणार नाही. खरं तर तो, या चित्रपटांच्या यशाने 'पुन्हा आपले दिवस' येतील अशा प्रचंड आशेवर होता. तशा त्याने कित्ती कित्ती गोडधोड मुलाखती दिल्या आणि तो गॉसिप्स मॅगझिनच्या मुखपृष्ठावर झळकला. पण म्हटलं ना, पब्लिसिटीत रंग असून उपयोग नाही, चित्रपटात दम असायला हवा. त्या काळात राजेश खन्नाचे चित्रपट फक्त आणि फक्त रौप्यमहोत्सवी यश संपादण्यासाठीच प्रदर्शित होतात असे घडायचे, त्याचेच चित्रपट चालणे चक्क बंद व्हावे? 'काळी जादू' व्हावी असं घडलं.


रमेश सिप्पी दिग्दर्शित 'शान'(१९८०) नक्कीच 'शोले'चा (१९७५) विक्रम मोडेल अशीही हवा होती. 'सहा कोटीचा चित्रपट' अशी 'शान'ची जोरदार पब्लिसिटी झाली. चाळीस वर्षांपूर्वी सहा कोटी खूपच मोठी रक्कम होती. 'शोले'च्या अमजद खानच्या गब्बरसिंगपेक्षाही कुलभूषण खरबंदाचा शाकाल डेंजरस असेल अशीही हवा होती. (भीती वाटत होती म्हणा.) प्रत्यक्षात तसे काहीच झाले नाही. अमिताभ बच्चनची मगरीसोबतची झुंजही लुटूपुटूची ठरली. एवढे असूनही 'शान'ने मिनर्व्हा चित्रपटगृहात चक्क रौप्यमहोत्सवी यश संपादले. अमिताभ बच्चनचे पडले पडले म्हणून ओळखले जात असलेल्या 'पुकार' आणि 'द ग्रेट गॅम्बलर' (दोन्हीत डबल रोल) तसेच 'महान' (तिहेरी भूमिका) या चित्रपटांनी चक्क मिथुन चक्रवर्तीच्या हिट चित्रपटापेक्षा जास्त यश संपादले. अपयशाची ही दुसरी बाजू. 'दीदार ए यार' आणि 'स्टार' हे मोठे चित्रपट एकाच शुक्रवारी प्रदर्शित झाले आणि एकदमच पडले. या अपयशाची भरपूर चर्चा झाली. दीदार ए यारच्या अपयशाची भरपूर टवाळी झाली, विनोद झाले. या चित्रपटाचा निर्माता जितेंद्र होता. एकदा म्हणे, इनकम टॅक्सच्या धाडीत जितेंद्रच्या बंगल्यात दीदार ए यारची तिकीटे मिळाली. प्रेक्षकांनी ती घेतली नाहीत म्हणून जितेंद्रने घेऊन ठेवली म्हणे. 'स्टार' पहिल्याच दिवशी आपटला आणि कुमार गौरव 'स्टार' व्हायचा राहिला. राजेंद्रकुमारला आपल्या मुलाला 'स्टार' करण्याची घाई होती म्हणून पब्लिकला काय ते ठरवूदेत ना? अपयशाच्या गंमती कमी आहेत का? 'इमान धरम'च्या अपयशाने पटकथा आणि संवाद लेखक सलिम-जावेद यांच्यावर बरीच टीका झाली. आपल्या पटकथेवर कानाकोपऱ्यात दिग्दर्शकांना सगळ्या सूचना असतात, त्याना फार काही करावे लागत नाही हा त्यांचा विलक्षण अभिमान या अपयशाने टीकेचा ठरवला. गॉसिप्स मॅगझिनमधून याची बरीच उलटसुलट चर्चा रंगली. 'मंझिल मंझिल' आणि 'जबरदस्त' या फ्लॉपनी मसालेदार मनोरंजक चित्रपटाचे हुकमी निर्माता आणि दिग्दर्शक नासिर हुसेन यांनी चक्क दिग्दर्शनातून निवृत्ती घेतली. तेव्हा त्यांचे चाहते हळहळले. देव आनंदला आपला चित्रपट कितीही आपटला तरी तो कायमच 'मै जिंदगी का साथ निभाता चला गया' अशा वृत्तीने वावरला. 'इश्क इश्क इश्क' नावाच्या आपल्या चित्रपटाचे सगळे चित्रीकरण त्याने काठमांडूला केले, भरपूर खर्चही केला. सगळ्या युनिटने फार मौजमजा केली, पण हा थंड हवेच्या ठिकाणी शूटिंग केलेला चित्रपट गल्ला पेटीवरही थंडाच राहिला, पण या फ्लॉपखाली खचून जाणारा देव आनंद नव्हता. त्याचे 'सच्चे का बोलबाला', अव्वल नंबर, 'प्यार का तराना', 'सेन्सॉर', 'गॅन्गस्टर' असे चित्रपट ओळीने अपयशी ठरूनही देव आनंदचा चित्रपट निर्मितीचा उत्साह कायम राहिलाय. काही माणसे अपयशाचा विचार करीत नाहीत हेच यातून दिसते. तो 'प्रेम पुजारी' (१९७१) पासून दिग्दर्शनात उतरला तेव्हाच त्याच्या दिग्दर्शनातील क्षमतेवर विश्वास नव्हता. तरी त्याने 'हरे राम हरे कृष्ण' (१९७२) मध्ये चमक दाखवली. विजय आनंद द ग्रेट दिग्दर्शक. पण 'ब्लॅक मेल' (१९७३)च्या अपयशानंतर त्याचे दिग्दर्शनीय कसब व कौशल्य जणू त्याला सोडून गेले. मोठा चित्रपट अपयशी ठरताना दिग्दर्शकाच्या आत्मविश्वासावर परिणाम करतो. राज खोसलाबाबतही तोच प्रकार. एकेकाळी सी. आय. डी, बम्बई का बाबू, मेरा साया, वो कौन थी, दो रास्ते, मेरा गाव मेरा देश, मै तुलसी तेरे आंगन की असे सुपर हिट चित्रपट देणारे राज खोसला तेरी मांग सितारो से भर दू, दो प्रेमी, सनी, मेरा देश मेरा धर्म, नकाब असे ओळीने फ्लॉप चित्रपट देणारे ठरले. मनमोहन देसाईंचा शेवटचा चित्रपट 'गंगा जमुना सरस्वती ' (१९८९)चे अपयशही बहुचर्चित. अमिताभ बच्चनचा हा त्या काळातील सर्वात मोठा फ्लॉप. खरं तर मनमोहन देसाई आणि अमिताभ या जोडीने अमर अकबर ॲन्थनीपासून सुपरड्युपर हिटचे सातत्य ठेवले. परवरीश, सुहाग, नसीब, देशप्रेमी, कुली, मर्द असे प्रत्येक चित्रपट ओळीने सुपर हिट. गंगा जमुना सरस्वतीच्या मोठ्या अपयशाने सगळे गणित बिघडवले. मुंबईतील आम्हा चित्रपट समीक्षकांना हा चित्रपट मुंबईतील मेट्रो थिएटरमध्ये पब्लिकसोबत फर्स्ट शोमध्ये दाखवला असता मध्यंतरमध्ये दिग्दर्शक मनजी आणि केतन हे देसाई पिता पुत्र आम्हाला भेटायला असता त्यांचे चेहरेच सांगत होते, ते धास्तावलेत. (त्यांना रिपोर्ट समजलाय.)

दिग्दर्शक प्रकाश मेहरा आणि अमिताभ बच्चन ही 'जंजीर 'पासून जमलेली जोडी. प्रकाश मेहराने अमिताभला केवढी तरी विविधता दिली. या जोडीचा 'जादुगर' खूपच मोठा फ्लॉप ठरला आणि ही जोडी फुटली. काही अपयशे अशीदेखिल आहेत. प्रकाश मेहरा अधूनमधून घोषणा करीत राहिले आम्ही पुन्हा एकत्र येतोय. त्यांच्या बोलण्यातील उसने अवसान जाणवत होते.

रामगोपाल वर्माने रमेश सिप्पी दिग्दर्शित 'शोले'ची रिमेक करताना फारच हात भाजून घेतला. हे आव्हान पेलण्याची आपली क्षमता नाही हे रामूच्या का बरे लक्षात आले नसावे? 'रामगोपाल वर्मा की आग ' या नावाने चित्रपट प्रदर्शित झाला तोच 'ही आग नव्हे शेकोटी' अशी प्रतिक्रिया उमटली, पसरली आणि थिएटरवर सामसूम निर्माण झाली. मुकुल आनंद दिग्दर्शित 'त्रिमूर्ती', सुभाष घई दिग्दर्शित 'यादे', अभिषेक वर्मन दिग्दर्शित 'कलंक', आशुतोष गोवारीकर दिग्दर्शित 'व्हॉटस युवर राशी', अशा अनेक फ्लॉप चित्रपटांनी जणू पडण्याचा इतिहास घडवला. बोनी कपूर निर्मित व सतिश कौशिक दिग्दर्शित 'रुप की रानी चोरों का राजा'चे फ्लॉप होणे भारीच. पिक्चरचं इतकं शूटिंग झाले की फर्स्ट शो सुरू होईपर्यंत तरी पिक्चर पूर्ण होईल ना अशी थट्टा झाली. देशातील नऊ शहरात त्याचा ग्लॅमरस प्रीमियर रंगला. या फ्लॉपचा सतिश कौशिकने इतका आणि असा धसका घेतला की, यापासून शक्य तितकं दूर जाण्याचे त्याने केलेले प्रयत्न विनोदी झाले...

पिक्चर पहायचा की नाही हे पब्लिक ठरवतो. त्यात त्यांनी अनेक पिक्चर्सना नाकारण्याचा अधिकार आपल्या हाती ठेवला. 'आदिपुरुष'पर्यंत आलेला हा फ्लॉपचा प्रवास पुढे सुरू राहणारच आहे... कारण यह पब्लिक है पब्लिक. ते ठरवतील तो पिक्चर हिट आणि ते नाकारलेला पिक्चर फ्लॉप. सिधी बात.






---

# प्रधानमंत्री कुसुम योजना

# दिवसाच्या मोफत विजेमुळे शाश्वत सिंचनाची सोय




**शेती करताना शेतकऱ्यांना वीज अखंडपणे मिळावी म्हणून सौर कृषी पंप उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने प्रधानमंत्री कुसुम योजना सुरू केली आहे. राज्य शासनाकडून महाकृषी ऊर्जा अभियान राबविले जात आहे. शासन आपल्या दारी उपक्रमांतर्गत शेतकऱ्यांना सौर कृषीपंप उपलब्ध करून दिले जात असून, पिकांना पाण्याची आवश्यकता असते वेळी शेतकरी पाणी देऊ शकणार आहे. हे या योजनेचे मुख्य फलित राहणार आहे. सिंचित क्षेत्रामुळे शेतकऱ्याला दिवसा मोफत व अखंड वीज मिळण्याची सुविधा उपलब्ध होत आहे. केंद्र शासनाकडून देशभरात राबविण्यात येत असलेल्या प्रधानमंत्री किसान ऊर्जा सुरक्षा आणि उत्थान महाभियानाला (पीएम-कुसुम) राज्यात गती देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. केंद्र शासनाच्या नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय, नवी दिल्ली यांनी २२ जुलै, २०१९ रोजी पीएम-कुसुम योजनेसाठी मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत.**

राज्य शासनाने १२ मे २०२१ रोजी या योजनेसाठी शासन निर्णय निर्गमित केला असून या योजनेंतर्गत दरवर्षी १ लाख नग या प्रमाणे पुढील पाच वर्षांमध्ये पाच लक्ष सौर कृषिपंप आस्थापित करण्याचे उद्दिष्ट निश्चित केले. अटल सौर कृषीपंप योजना-१ व २ आणि मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजनेमध्ये लाभ घेतलेले शेतकरी महाकृषी ऊर्जा अभियन पीएम-कुसुम घटक-ब योजनेसाठी पात्र नाहीत. त्यामुळे त्यांनी महाकृषी ऊर्जा अभियन पीएम-कुसुम घटक-ब योजनेच्या पोर्टलवर ऑनलाईन अर्ज भरू नयेत. तरी सुद्धा अर्ज भरल्यास त्यांचा अर्ज रद्द करण्यात येणार आहे.

महाकृषी ऊर्जा अभियान पीएम-कुसुम घटक-ब योजनेंतर्गत एका लाभार्थी शेतकऱ्याने एकाच सौर कृषीपंपासाठी अर्ज सादर करावा. एकापेक्षा जास्त अर्ज सादर केल्यास इतर अर्ज रद्द करण्यात येणार आहे, तशी स्पष्ट सूचना पोर्टलवर फॉर्म भरताना दिली जाते. लाभार्थी हिस्सा- पीएम कुसूम योजनेंतर्गत खुल्या प्रवर्गातील शेतकऱ्यांना ९० टक्के व अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांना ९५ टक्के अनुदानावर सौर कृषीपंप उपलब्ध होणार आहेत.

पीएम कुसूम योजनेंतर्गत तीन एच.पी. पंपासाठी पंपाची किंमत जीएसटी सह १ लाख ९३ हजार ८०३ असून सर्वसाधारण प्रवर्गासाठी १० टक्के लाभार्थी हिस्सा १९ हजार ३८०, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी पाच टक्के लाभार्थी हिस्सा नऊ हजार ६९० इतका राहील. कृषिपंप पाच एच.पी. पंपासाठी जीएसटीसह दोन लाख ६९ हजार ७४६ रुपये असून सर्वसाधारण प्रवर्गासाठी १० टक्के लाभार्थी हिस्सा २६ हजार ९७५, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी पाच टक्के लाभार्थी हिस्सा १३ हजार ४८८ इतका राहील.

कृषिपंपासाठी ७.५ एच.पीची किंमत जीएसटीसह तीन लाख ७४ हजार ४०२ असून सर्वसाधारण प्रवर्गासाठी १० टक्के लाभार्थी हिस्सा ३७ हजार ४४०, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी पाच टक्के लाभार्थी हिस्सा १८ हजार ७२० इतका राहील.

पीएम कुसूम- ब योजनेसाठी पात्रता- या योजनेचा लाभ घेण्यासाठी ज्या शेतकऱ्यांकडे शाश्वत जलस्रोत उपलब्ध आहे, असे सर्व शेतकरी पात्र राहतील. मात्र अशा शेतकऱ्यांकडे पारंपारिक पद्धतीने विद्युत जोडणी झालेली नसणे आवश्यक राहील. २.५ एकरापर्यंत शेतजमीनधारक शेतकऱ्यास ३ अश्वशक्ती क्षमतेपर्यंतचे सौर कृषीपंप २.५१ ते पाच एकरापर्यंत शेतजमीन धारक शेतकऱ्यास पाच अश्वशक्ती क्षमतेचा आणि पाच एकरावरील शेतजमीन धारक शेतकऱ्यास ७.५ अश्वशक्ती क्षमतेचा सौर कृषीपंप देय राहील. तसेच पात्र क्षमतेपेक्षा कमी क्षमतेच्या सौर कृषीपंपाची मागणी केल्यास तो अनुज्ञेय राहील. कृषीपंप वीज जोडणी धोरण २०२० रोजी घोषित करण्यात आलेल्या धोरणातील निकषानुसार पात्र ठरणाऱ्या शेतकऱ्यांना सौर कृषीपंपाचे वाटप देय राहील.

वैयक्तिक किंवा सामुदायिक शेततळे, विहीर, बोअरवेल यांचे मालक तसेच बारमाही वाहणारी नदी, नाले यांच्या शेजारील शेतजमीनधारक शेतकरीसुद्धा या योजनेसाठी पात्र राहतील. ज्या शेतकऱ्यांकडे कुपनलिका, विहीर व नदी इ. ठिकाणी शाश्वत जलस्रोत आहेत, याची खात्री महाऊर्जाद्वारे करण्यात येईल. तथापि, जलसंधारण कामाच्या पाणी जिरविण्याच्या पाणीसाठ्यामधून पाणी उपसण्यासाठी हा पंप वापरता येणार नाहीत.

अटल सौर कृषी पंप योजना-१, अटल सौर कृषी पंप योजना २ व मुख्यमंत्री सौर कृषिपंप योजनांचा लाभ न घेतलेले लाभार्थी शेतकरी देखील या अभियानांतर्गत लाभास पात्र असतील. मुख्यमंत्री सौर कृषिपंप योजना या योजनेंतर्गत महावितरण कंपनीकडे अर्ज केलेले पात्र परंतु सौर कृषीपंप वाटप न झालेले लाभार्थी या अभियानांतर्गत पात्र राहतील.


ज्या शेतकऱ्यांना ७.५ एचपीपेक्षा जास्त क्षमतेच्या सौर कृषीपंपाची आवश्यकता आहे, असे शेतकरी ७.५ अश्वशक्तीपेक्षा जास्त क्षमतेचा कृषीपंप आस्थापित करू शकतात, परंतु ते ७.५ अश्वशक्ती क्षमतेच्या सौर कृषिपंपासाठी देय असलेल्या अनुदानास पात्र असतील. उर्वरीत अधिकची रक्कम संबंधित लाभार्थ्यांनी भरणे आवश्यक राहील. सौर कृषिपंपाद्वारे उपलब्ध होणाऱ्या वीजेमुळे जर शेतकऱ्याला इतर वीज उपकरणांच्या वापरासाठी युनिव्हर्सल सौर पंप कंट्रोलरचा वापर करता येईल, मात्र त्यासाठीचा खर्च संबंधित लाभार्थ्यांने करणे आवश्यक असेल.

सौर कृषीपंप आस्थापनेचे उद्दिष्ट, पीएम-कुसुम योजनेच्या शासन निर्णयातील नमूद तरतूद, जिल्ह्याच्या ग्रामीण लोकसंख्येनुसार व प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वावर पूर्ण करावयाचे आहे. महाऊर्जामार्फत शेतकऱ्यांचे नवीन अर्ज स्विकारण्यासाठी १७ मे २०२३ पासून कुसुम योजनेचे ऑनलाईन पोर्टल सुरू करण्यात आले आहे. अर्जासाठी महाऊर्जाच्या https://kusum.mahaurja.com/.../Kusum-Yojana-Component-इ संकेतस्थळावर भेट देऊन ऑनलाईन अर्ज करावा. या योजनेची व ऑनलाईन अर्ज करण्याची सर्व माहिती महाऊर्जा http://www.mahaurja.com संकेतस्थळावर उपलब्ध आहे. महाऊर्जामार्फत सुरू केलेल्या ऑनलाईन पोर्टलचा लाभ सर्व शेतकऱ्यांनी घ्यावा,असे आवाहन महाऊर्जा, कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

**-मनोज शिवाजी सानप,**
**जिल्हा माहिती अधिकारी,**
**रायगड-अलिबाग**

---

आयुष्यामध्ये काही निर्णय घेत असताना आपले मन कधी तळ्यात तर कधी मळ्यात असते. कारण एखाद्या प्रसंगाच्या वेळी समोरच्या व्यक्तीला 'हो म्हणावे की नाही म्हणावे' हाच प्रश्न आपल्या समोर बऱ्याचदा उपस्थित होतो. त्यामुळे कधी कधी आपल्याला समोरच्या व्यक्तीला 'नाही' म्हणायचे असतानाही आपण त्या व्यक्तीला 'नाही' म्हणू शकत नाही. त्यांना काय वाटेल हा एकच विचार करून आपण आपल्या मनाची तयारी नसतानाही समोरच्या व्यक्तीला होकार देतो. हेच होकार पुढे जाऊन आपल्यासाठी त्रासदायक ठरतात आणि जेव्हा आपल्याला त्रास होतो तेव्हा वाटते की, त्यावेळी आपण नाही म्हटले असते तर, बरे झाले असते...



आपल्या सोबत तो बोलणारही नाही, बऱ्याचदा असेही होते की, समोरच्या व्यक्तीचा रुसवा, फुगवा वाढत जाईल आणि हे सर्व आपल्या सोबतच होणारच आहे. पण आयुष्यामध्ये एक वेळ अशी नक्कीच येते की, त्यावेळी आपल्या नकाराचासुद्धा समोरचा व्यक्ती सन्मान करतो आणि पुढे क्षणभर तुटलेले नाते जन्मभरासाठी मजबूत होते.

नाती फार नाजूक असतात. कारण नाती जुळायला खूप वेळ लागत असला तरीही एखादा लहान प्रसंगही जवळची नाती एका क्षणात तोडतो. त्यामुळे नाती टिकवत असताना नात्यांची खूप काळजी आपल्याला घ्यावी लागते. अनेकदा स्वतः च्या मनाचा कोणताही विचार न करता आपण समोरच्या व्यक्तीला जे आवडते ते

# नाही म्हणायला शिका..!

आयुष्यामध्ये आपण नेहमी समाजातील लोकांचा, नात्यांचा खूप जास्त प्रमाणात विचार करत असतो. त्यामुळे बऱ्याचदा लोकांना आवडणाऱ्या गोष्टी आपण कळत-नकळतपणे करतो. कधी कधी लोकांचा खुश करण्याच्या नादात आपण स्वतःच्या मनाचा कसलाही विचार करत नाही आणि फक्त समोरचे नाते टिकले पाहिजे आणि ती व्यक्ती नाराज होऊ नये म्हणून आपल्या मनाची तयारी नसतानासुद्धा आपण समोरच्या व्यक्तीला 'हो' म्हणतो. आपण हो म्हटल्याने त्यावेळी समोरील व्यक्ती खुश सुद्धा होईल, परंतु काही दिवसांतच त्याचे वाईट परिणाम आपल्या नात्यावर पडतील आणि पुन्हा आपण तोच विचार करू 'नाही' म्हटले असते तर बरे झाले असते...

आपल्या मनाची तयारी नसेल तर आपल्याला हक्काने समोरच्याला 'नाही' म्हणता आले पाहिजे. कारण आपण 'हो' म्हटल्याने जर पुढे जाऊन वाईट परिणाम होणार असतील तर असे होकार न दिलेले बरे! आपण नाही म्हटले तर क्षणभर समोरच्याला आपला रागही येईल, तो आपल्यावर नाराज सुद्धा होईल, काही वेळ करत असतो. त्याच्या मर्जीने आपण वागत असतो. तो नाचवतो आणि आपण नाचत जातो, परंतु प्रत्येकवेळी समोरील व्यक्तीच्या इशाऱ्यावर आपण नाचायचे नसते. कारण स्वतःला त्रास करून घेण्यात मनाचा कोणताही मोठेपणा नसतो. त्यामुळे जिथे गरज आहे तिथे आपण 'नाही' म्हटले पाहिजे. कारण दुर्घटना होण्यापूर्वी ब्रेक व्यवस्थित लागले तर नुकसान कमी होते...

आपल्या मनापेक्षा आपल्याला समोरच्या व्यक्तीच्या मनाची जास्त चिंता वाटायला लागते. तेव्हा आपण मागचा पुढचा कोणताही विचार न करता त्यांच्या कोणत्याही गोष्टीला सरळ-सरळ 'हो' म्हणून देतो. परंतु हीच गोष्ट आपल्याला बऱ्याचदा घातक सुद्धा ठरत असते. कारण आयुष्याच्या प्रवासात असे एखादे वळण येतेच ज्यावेळी स्वतःच्या निर्णयावरच चिंतन करायची वेळ आपल्यावर येते. परंतु त्यावेळी घडून गेलेल्या क्षणाला 'रिव्हर्स' घेता येत नाही. म्हणून ज्या आनंदाने एखाद्याला आपण 'हो' म्हणतो अगदी त्याचप्रमाणे आपल्याला एखाद्याला 'नाही' म्हणायला म्हणता आले पाहिजे...

**-सुरज दहागावकर, चंद्रपूर**

# पोलादपूर तालुक्यात पावसाची जोरदार हजेरी

## झाडे कोसळण्याच्या तुरळक घटना

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यात शनिवारी (दि. २४) दुपारपासून पावसाने जोरदार हजेरी लावली. सोसाट्याचा वारा वाहू लागल्याने शहरामध्ये झाडे कोसळल्याच्या तुरळक घटना झाल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

तहसीलदार कपिल घोरपडे यांनी पावसाच्या आगमनासोबतच तालुक्यातील रुग्णालयांची सज्ज्ता तपासून पाहिली. तालुक्यात जोरदार पावसाचे आगमन झाले आणि काही ठिकाणी सोसाट्याचा वारा आल्याने झाडे कोसळून पडण्याच्या घटनांनी किरकोळ नुकसान झाले. आनंदनगर येथील वैशाली सलागरे यांच्या घरावर एक झाड कोसळल्याने घराच्या छप्पराचे नुकसान झाले.

या घटनेची खबर मिळताच तहसीलदार कपिल घोरपडे यांनी नगरपंचायतीचे अधिक्षक महादेव सरंबळे यांच्यासमवेत घटनास्थळी पाहणी केली.

घरावर कोसळलेले झाड कापून घेण्यासह तातडीने पंचनामा करण्याचे आदेश तहसिलदारांनी नगरपंचायतीचे अधिक्षक महादेव सरंबळे यांना दिले. आनंदनगरचे नगरसेवक स्वप्नील भुवड आणि त्यांचे सहकारी हरेश नगरकर यांनीही नुकसानीची पाहणी केली.



**दरडप्रवण क्षेत्रातील ग्रामस्थांना केले प्रशासनाने सतर्क**

**तहसीलदार घोरपडे यांनी दरडप्रवण क्षेत्रातील चोळई आणि धामणदिवी येथील ग्रामस्थांची भेट घेऊन मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणावेळी कशेडी घाटातील डोंगर कापल्यानंतर दरडी कोसळण्याच्या शक्यतेमुळे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करण्यासाठी चर्चा केली.**

# मुरुडमध्ये दाखले वाटप शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

## ९९५हून अधिक नागरिकांनी घेतला लाभ

**मुरूड : प्रतिनिधी**

शासन आपल्या दारी या उपक्रमांतर्गत जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे व अलिबाग उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली मुरूड तहसीलदार कार्यालयामार्फत गुरुवारी (दि. २२) शैक्षणिक दाखले, पीएम किसान योजना, ई-केवायसी, आधार सिडींग, रेशन कार्ड देणे असे विविध प्रकारचे दाखले देण्यासाठी एकदिवसीय विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरामध्ये तालुक्यातील नागरिकांना दुय्यम शिधापत्रिका ४७५, उत्पन्न दाखले १३०, वय व अधिवास दाखले ९५, नवीन मतदार नोंदणी व दुरुस्ती ६०, पीएम किसान ई-केवायसी ५५, आयुष्मान भारत कार्ड ४८, आधार कार्ड ४०, शिधापत्रिकेत नाव दाखल करणे ३५, पॅन कार्ड २०, ई-श्रम कार्ड १५, शेतकरी दाखले १२, ई-दाखले १० अशा एकूण ९९५ दाखल्यांचे वाटप करण्यात आले. तहसीलदार रोहन शिंदे यांनी सर्वांचे आभार मानले व शिल्लक असलेल्या लाभार्थींनी पीएम किसान ई-केवायसी करून घेण्याचे आवाहन केले.

या वेळी नायब तहसीलदार गोविंद कोटंबे, मंडळ अधिकारी खुशाल राठोड, सुग्रीव वाघ, शिक्षण मंडळाचे प्रशासक अधिकारी दिपाली दिवेकर, मंडळ अधिकारी संजय तवर, ज्ञानोबा थिखे, विजय म्हापुस्कर, उदय सबनीस आदींसह नागरिक उपस्थित होते.



# रोह्यात पावसाच्या सरी बरसल्या

**धाटाव : प्रतिनिधी**

रोह्यात शनिवारी पावसाच्या दमदार आगमनामुळे बळीराजा सुखावला आहे, तर दुसरीकडे हवेत गारवा निर्माण झाल्याने नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

शनिवारी सकाळी सात वाजल्यापासूनच पावसाच्या हलक्या सरी बरसात होत्या. दुपारनंतर नंतर जोरदार पावसाने हजेरी लावल्याने शेतीच्या शेतीच्या



उर्वरीतत कामास मोकळा झालेला आहे. धाटाव, चणेरा, खांब, सुतारवाडी, घोसाळे, पुई, शेणवई, पिंगळसई या परिसरात पावसाने आगमन केले आहे. सायंकाळनंतर तालुक्यात ढगाळ वातावरण होते.

**गेल्या काही दिवसांपासून पाऊस गायब झाला होता. त्यामुळे दुबार पेरणी करावी लागते की, काय अशी परिस्थिती निर्माण झाली होती, परंतु आजच्या पावसामुळे शेतीच्या उर्वरित कामे करण्यासाठी पोशक वातावरण तयार झाले आहे.**

**-जयवंत शिगवण, शेतकरी**

# मुरुडमध्ये पावसाचे आगमन; शेतकरी सुखावला

**मुरूड : प्रतिनिधी**

गेल्या अनेक दिवसांपासून प्रतीक्षा करायला लावणाऱ्या पावसाने अखेर मुरूडमध्ये शनिवारी (दि. २४) हजेरी लावली. शुक्रवारी रात्रीपासून शहरात पावसाच्या हलक्या सरी कोसळत होत्या. त्यानंतर शनिवारी पहाटे जोरदार पावसाने हजेरी लावत दिलासा दिला आहे. शेतकरीही सुखावला आहे.

हा पाऊस सतत पडत राहिला तर लवकरच पेरणीला



सुरुवात होणार आहे.

काही दिवसांपूर्वी पाऊस फक्त सात मिलीमीटर एवढाच बरसला होता. त्यानंतर मात्र पावसाने दडी मारल्याने पेरण्या खोळंबल्या होत्या, परंतु शनिवारी सकाळपासून पाऊस कायम बरसात राहिल्याने वातावरणात गारवा निर्माण झाला. पावसाला सुरुवात झाल्याने शेतकऱ्यांनी आता शेतात धान्य टाकून राब वाढवण्याच्या प्रक्रियेला सुरुवात केली आहे.


गेल्या अनेक दिवसांपासून शेतकरी पाऊस पडण्याची वाट पहात होता, परंतु आज पावसाने दमदार हजेरी लावल्याने नागरिकांनी सुटकेचा श्वास घेतला आहे.

# मुरुडमध्ये नगरपालिकेने राबविली स्वच्छता मोहीम

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड शहरामध्ये नगरपालिकेमार्फत स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. स्वच्छता आरोग्याच्या दृष्टिकोनातून महत्त्वाची आहे. वेळच्या वेळी आपला घरातील कचरा रस्त्यावर न टाकता नगरपालिकेच्या घंटागाडीमध्ये टाकावा व आपले शहर स्वच्छ व सुंदर कसे राहील यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन या वेळी त्यांनी केले.

मुरूड एकदरा ब्रिजपासून स्वच्छता मोहिमेला सुरुवात करण्यात आली



ते तवसाळकर पकटीपर्यंत करण्यात आली. या मोहिमेत प्रशासक तथा मुख्याधिकारी पंकज भुसे, प्रमोद भायदे, शिक्षण मंडळाचे प्रशासिक अधिकारी दिपाली दिवेकर, परेश कुंभार, नरेंद्र नांदगावकर, राकेश पाटील, नंदकिशोर आंबेतकर, संजय वेटकोळी, सतेज निमकर, प्रकाश आरेकर, मनोज पुलेकर, मोहन करंदेकर, ऋषि बैले, यशवंत सवाई, गोंजी, चिंदानंद व्हटकर, कपिल वेहेले, सुदेश माळी, अभिजित चांदोरकर, सतिष जंजिरकर, अक्षता तुळसकर, स्वप्नजा विरुकुड, दिपक शिंदे, रुपेश भाटकर, प्रणाली शिंदे, सचिन कोरके, शुभ्रा कारभारी, पल्लवी डोंगरीकर, भारतीय तटरक्षक दलाचे जवान, कोळी बांधव सहभागी झाले होते.

# उरण नगरपरिषद, उरण

**जिल्हा : रायगड पिन कोड - ४०० ७०२.**

**जाहीर आवाहन**

उरण शहरातील सर्व नागरीकांना आवाहन करणेत येते की सोबत यादीमध्ये जोडलेल्या जागा या उरण शहरच्या दुसऱ्या सुधारीत विकास योजनेमध्ये विविध आरक्षणाने बाधित होत आहेत. सबब सदर आरक्षणाचे जागेत कोणत्याही प्रकारचे बांधकाम करणेस सक्त मनाई आहे. सदर जागेत अनधिकृत बांधकाम केलेचे निदर्शनास आल्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५२ व ५३ अन्वये कायदेशीर कार्यवाही करणेत येईल याची कृपया सर्व नागरिकांनी नोंद घ्यावी.

**उरण नगरपरिषदेची दुसरी सुधारीत विकास योजना**

**शासकीय/निमशायकीय आरक्षणे - २५, २६, २७, २८, २९/A, ३२,३५-०७**

**नगरपरिषदेची आरक्षणे ५४**

**एकूण आरक्षणे ६१**

| अ.क्र. | आरक्षण क्रमांक | आरक्षणाचे नांव | सर्व्हे नंबर | जागेचा तपशील |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | १ | गार्डन | १७७ पार्ट बोरीपाखाडी | शासकीय जागा |
| २ | २ | ओपन स्पेस | १०८ पार्ट बोरीपाखाडी | शासकीय जागा |
| ३ | ३ | Elevated Service Reservoir | १०८ पार्ट बोरीपाखाडी | शासकीय जागा |
| ४ | ५ | प्रायमरी स्कूल | १७६ पार्ट ९७ पार्ट बोरी पाखाडी | खाजगी/शासकीय |
| ५ | ६ | डिस्पेंसरी | ११०A पार्ट बोरीपाखाडी | खाजगी |
| ६ | ७ | एक्सटेंशन टू प्रायमरी स्कूल | ११०A पार्ट बोरीपाखाडी | खाजगी |
| ७ | ८ | प्ले ग्राऊंड | ९६ पार्ट बोरीपाखाडी | शासकीय/नगरपरिषद |
| ८ | ९ | गार्डन | ९६ पार्ट बोरीपाखाडी | शासकीय/नगरपरिषद |
| ९ | १० | ओपन स्पेस | ९५/बी पार्ट बोरीपाखाडी | खाजगी |
| १० | ११ | एक्सटेंशन टू गार्डन | ८८ पार्ट बोरीपाखाडी | शासकीय/नगरपरिषद |
| ११ | १२ | पंपिंग स्टेशन | ९० पार्ट बोरीपाखाडी | खाजगी |
| १२ | १३ | प्ले ग्राऊंड | ८८/बी पार्ट बोरीपाखाडी | खाजगी |
| १३ | १४ | वॉटर वर्क्स प्लॉट | ८७ पार्ट बोरीपाखाडी | सॉल्ट डिर्पा. सेंट्रल गर्व्हमेंट |
| १४ | १५ | गार्डन | ८७ पार्ट बोरीपाखाडी | सॉल्ट डिर्पा.सेंट्रल गर्व्हमेंट |
| १५ | १६ | प्ले ग्राऊंड | १२८ पार्ट बोरीपाखाडी | खाजगी |
| १६ | १८ | फायर ब्रिगेड स्टेशन | १४२/A बोरीपाखाडी | नगरपरिषद |
| १७ | १९ | गार्डन | १४२/B बोरीपाखाडी | नगरपरिषद |
| १८ | २० | गार्डन अँड ग्राऊंड लेव्हल वॉटर रिझरवार | ५ पार्ट बोरीपाखाडी | खाजगी |
| १९ | २१ | एलिव्हेटेड सर्व्हिस रिझरवायर | ५ पार्ट बोरीपाखाडी | खाजगी |
| २० | २३ | ओपन स्पेस | ३१६ पार्ट बोरीपाखाडी | खाजगी |
| २१ | २४ | फेअर ग्राऊंड | ३२१ पार्ट, ३२२ पार्ट, ३२३ पार्ट बोरीपाखाडी | खाजगी |
| २२ | २५ | वुमन वेलफेअर सेंटर अँड गर्ल्स हॉस्टेल | १७५ पार्ट बोरीपाखाडी | खाजगी |
| २३ | २६ | पोस्ट अँड टेलिग्राफ डिर्पा. | १७५ पार्ट बोरीपाखाडी | खाजगी |
| २४ | २७ | गर्व्हमेंट स्टाफ क्वार्टर्स | १७५ पार्ट बोरीपाखाडी | खाजगी |
| २५ | २८ | गर्व्हमेंट ऑफिसेस | १७५ पार्ट बोरीपाखाडी | खाजगी |
| २६ | २९ | शॉपिंग सेंटर | १५० पार्ट बोरीपाखाडी | खाजगी |
| २७ | २९/A | पोलिस डिर्पा. | १५० पार्ट बोरीपाखाडी | खाजगी |
| २८ | ३० | गार्डन | १५० पार्ट बोरीपाखाडी | खाजगी |
| २९ | ३१ | पार्किंग | १६१ पार्ट बोरीपाखाडी | खाजगी |
| ३० | ३२ | एक्सटेंशन टू ज्युडिशिअल डिर्पा. | १५३ पार्ट चाणजे | खाजगी |
| ३१ | ३५ | एक्सटेंशन टू गर्व्ह. ऑफिसेस | १५८ पार्ट बोरीपाखाडी | शासकीय |
| ३२ | ३६ | पार्किंग | १५८ पार्ट बोरीपाखाडी | शासकीय |
| ३३ | ३७ | प्ले ग्राऊंड | १५४ पार्ट बोरीपाखाडी | खाजगी |
| ३४ | ३८ | सीवेज वॉटर ट्रीटमेंट प्लॅट | ९८ पार्ट चाणजे | खाजगी |
| ३५ | ३९ | गार्डन | ९८ पार्ट चाणजे | खाजगी |
| ३६ | ४२ | ओपन स्पेस | सि.टी.एस.नं.५७६ चाणजे | खाजगी |
| ३७ | ४३ | पार्किंग | सि.टी. एस.नं. ५१७ चाणजे | खाजगी |
| ३८ | ४४ | म्युनिल स्टोअर/मार्केट | सि.टी.एस.नं. ६०६ चाणजे | नगरपरिषद |
| ३९ | ४५ | ओपन स्पेस | सि.टी.एस.नं.६०६ पार्ट चाणजे | खाजगी |
| ४० | ४६ | प्रायमरी स्कूल अँड प्ले ग्राऊंड | ११९/A & ११९B पार्ट चाणजे | खाजगी |
| ४१ | ४७ | गार्डन | ७५ आणि ८५ पार्ट चाणजे | खाजगी |
| ४२ | ४९ | पार्किंग | स.नं. ८४ /A चाणजे | खाजगी |
| ४३ | ४९/A | पार्किंग | विर सावरकर खेळाचे मैदान | नगरपरिषद |
| ४४ | ५१ | ओपन स्पेस | १०१३/A चाणजे | खाजगी |
| ४५ | ५२ | मार्केट | सि.टी.एस.नं.९३२ ते ९३४ चाणजे | खाजगी/नगरपरिषद |
| ४६ | ५३ | म्युपल. परपज | सि.टी.एस.नं.८७६ चाणजे | नगरपरिषद |
| ४७ | ५४ | गार्डन | ७८ पार्ट म्हातवली | खाजगी |
| ४८ | ५५ | म्युपल स्टाफ क्वार्टर्स | ७५/A पार्ट म्हातवली | नगरपरिषद |
| ४९ | ५६ | म्युपल. परपज | ७५/A पार्ट म्हातवली | नगरपरिषद |
| ५० | ५७ | म्युनिपल ऑफिस | म्हातवली | नगरपरिषद |
| ५१ | ५८ | कल्चरल सेंटर | ७५/A पार्ट म्हातवली | नगरपरिषद |
| ५२ | ५९ | गार्डन | स.नं.७० पार्ट म्हातवली | खाजगी |
| ५३ | ६० | प्रायमरी स्कूल | स.नं. ७३ पार्ट म्हातवली | खाजगी |
| ५४ | ६१ | प्ले ग्राऊंड | ६८ पार्ट म्हातवली | खाजगी |
| ५५ | ६२ | प्ले ग्राऊंड | ६६/B म्हातवली | खाजगी |
| ५६ | ६४ | गार्डन | ३३ पार्ट म्हातवीली | खाजगी |
| ५७ | ६५ | हॉस्पीटल, नर्सिंग कॉलेज अँड मेडीकल कॉलेज | स.नं.८,९,१०,११ पार्ट म्हातवली | खाजगी |
| ५८ | ६६ | प्ले ग्राऊंड | स.नं.१६५ बोरीपाखाडी | खाजगी |
| ५९ | ६७ | Cremation Ground | स.नं.८९ बोरीपाखाडी | खाजगी |
| ६० | ६८ | ओपन स्पेस | स.नं. ८६/२/२ चाणजे | खाजगी |
| ६१ | ६९ | गार्डन | स.नं.१० पार्ट चाणजे | खाजगी |

**सही/-**
**(राहुल इंगळे)**
**नियोजन प्राधिकारी**
**तथा**
**मुख्याधिकारी**
**उरण नगरपरिषद**

# मोठे भाल येथील राईस मिलमध्ये चोरी

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील वडखळ पोलीस ठाणे हद्दीतील मोठे भाल येथील जयलक्ष्मी राईस मिलमधून चोरट्यांनी २४,५०० रुपये किमतीचे तेलाचे डबे चोरल्याची घटना घडली आहे.

फिर्यादी अजित नागजी म्हात्रे (वय ५२ रा. निर्मला एन्क्ल्यु १३ घरांची आळी, चावडीनाका, पेण) यांच्या मोठे भाल येथील जयलक्ष्मी राईस मिलमधून दोन चोरट्यांनी शुक्रवारी (दि. २२) पहाटे ४:४६ वा. च्या सुमारास अजित म्हात्रे यांच्या राईस मिलच्या पाठीमागील उघड्या असलेल्या बाजूने आतमध्ये शिरुन एकूण २४ हजार ५०० रुपये किमतीचे १० तेलाचे डबे चोरून नेले.

याबाबत वडखळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस नाईक अमित पाटील हे करीत आहेत.

# निजामपुरात पाणीपुरवठा योजनेसाठी उद्योगमंत्र्यांच्या आदेशाने सर्वेक्षण



**माणगाव : प्रतिनिधी**

निजामपूरसह दोन ग्रामपंचायतीतील नागरिकांना गेले अनेक वर्ष पिण्याच्या पाण्याचा प्रश्न भेडसावत आहे. निजामपूर ग्रामपंचायतीचे सरपंच राजाभाऊ रणपिसे व सदस्यांनी यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व पालकमंत्री उदय सामंत यांच्याकडे पाठपुरावा केला. त्याप्रमाणे तीन ग्रामपंचायतीच्या पाणीपुरवठ्यासाठी १३ कोटींची तत्त्वतः मान्यता देण्यात आली आहे.

एमआयडीसीच्या संबंधित अधिकाऱ्यांनी निजामपूर, कडापे, कोस्ते खुर्द येथे पाहणी करून सर्वेक्षण केले. त्या अधिकाऱ्यांचा निजामपूर ग्रामपंचायतीने सत्कार केला. निजामपूर ग्रामपंचायत पाणीटंचाईतून मुक्त होणार असल्याने नागरिकांनी आमदार भरत गोगावले यांचे ऋण व्यक्त केले. या वेळी विळे-भागाड एमआयडीसीचे अभियंता देशमुख व शेलार तसेच निजामपूर ग्रामपंचायतीचे सरपंच राजाभाऊ रणपिसे, सदस्य प्रसाद गुरव, विचारे, खेडेकर, माजी सरपंच बाळाराम दबडे, ग्रामविकास अधिकारी पोळ व राजिवडे यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

रवाळजे फिल्ट्रेशन प्लांटपासून स्वतंत्र जलवाहिनीद्वारे टाकण्याचे प्रयोजन केले असून लवकरच याचा आरखडा तयार करून शासनाला पाठवणार असल्याने निजामपूर पाणीटंचाईतून मुक्त होणार आहे. लवकरच पाणी मिळणार असल्याने नागरिकांतून आनंद व्यक्त होत आहे.

# मुरूड समुद्राकिनारी ग्रीन टर्टल प्रजातीचे कासव मृतावस्थेत

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड समुद्रकिनाऱ्यावर ग्रीन टर्टल प्रजातीचा एक मृत कासव साधारण ४० किलो वजनाचा व दोन फुट लांबीचे कासव वाहून आले आहे. कासवाच्या मृत्यू नेमका कशामुळे झाला हे समजू शकले नाही. कासवाच्या तोंडाला व पंखांना जखम झाली आहे. ग्रीन टर्टल हे दुर्मिळ जातीचे कासव असून याचे संवर्धन केले जाते.

समुद्रकिनारी मृत कासव आढळून येताच वनविभागाने नगर परिषदेची मदत घेत जेसीबीच्या सहाय्याने मोठा खड्डा खणून त्याची विल्हेवाट लावण्यात आली आहे.

वन्यजीव प्रेमी संदीप घरत यांनी सांगितले की, गेल्या अनेक वर्षांपासून समुद्रकिनारी मृत कासव वाहून येण्याचे प्रमाण वाढले आहे. काही कासव जाळ्यात अडकलेल्या अवस्थेतसुद्धा सापडले होते. त्यावेळी त्यांची जाळ्यातून मुक्तता करून त्यांना खोल समुद्रात सोडण्यात आले आहे. कासव अंडी टाकण्यासाठीही समुद्रकिनारी येत असतात. अशा वेळी त्यांना किनाऱ्यावरील जागा आवश्यक असते. प्रशासनाने जागा तयार केल्यास कासवांचे संवर्धन होण्यास मदत होणार आहे.



# मतदारसंघातील गाव, वस्त्यांचा विकास साधणार -आमदार महेंद्र दळवी

**रोहे : प्रतिनिधी**

२६ गाव पाणीयोजना हा महत्त्वाचा विषय असल्याने मी खंबीरपणे उभे राहत ही योजना मंजूर केली. येत्या सहा महिन्यात ही योजना कार्यान्वित करण्यात येईल. माझ्या मतदारसंघात २४१ कोटींची योजना आहे. या योजनेचे सात टप्पे असून आज पहिल्या टप्प्याचे भूमिपूजन झाले आहे. याच मतदारसंघातील बेलकवडे-खारापटी रस्त्याचे काम सुरू आहे. मी माझ्या मतदार संघातील गाव वस्त्यांचा विकास साधणार आहे. शेवटच्या माणसाकडे बघण्याचा दृष्टीकोन माझा आहे, असे प्रतिपादन आमदार महेंद्र दळवी यांनी व्यक्त केले.



रोहा तालुक्यात ३३ कोटी ४० लाख तीन हजार ११९ कोटी खर्चून २६ गावांसाठी कुंडलिक प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेचे भूमिपूजन आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते डोंगरी येथे करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते.

कार्यक्रमासाठी शिवसेना जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर, राजा केणी, बाळाशेठ तेलंगे, संतोष निगडे, जिल्हा संपर्कप्रमुख छाया पिंगळे, तालुका प्रमुख ॲड. मनोजकुमार शिंदे, तळा तालुका प्रमुख प्रघुम ठसाळ, युवा सेना प्रमुख संजय म्हात्रे, विपुल उभारे, सरपंच प्रगती देशमुख, शहर प्रमुख मंगेश रावकर, अल्पसंख्याक सेल प्रमुख उस्मान रोहेकर, जयवंत पोकळे, सरपंच गणेश खरीवले, मोतीराम गीजे, सुधाकर शिंदे, उद्देश वाडकर, विकास पाटील, जीवन देशमुख, शशी कडू, विजय बोरकर, संदेश मोरे, मदन गीजे, आशिष स्वामी, सायली सदावर्ते आदी उपस्थित होते.

जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर यांनी, आमदार भरत गोगावले, महेंद्र दळवी व महेंद्र थोरवे यांच्या माध्यमातून रायगड जिल्ह्यात विकासाची क्रांती झाली. श्रीवर्धन मतदारसंघात पुढील शिवसेनेचे आमदार निवडून द्यायचे आहे, असे आवाहन केले. ॲड. मनोजकुमार शिंदे व ॲड. अविनाश भगत यांनी पाणीपुरवठा योजना कार्यान्वित केल्याबद्दल आभार मानले. बाळाशेठ तेलंगे यांनीही मनोगत व्यक्त केले.

# शाळा, महाविद्यालयात नशामुक्त अभियानाद्वारे जनजागृती

## भागूबाई चांगू ठाकूर लॉ कॉलेजमध्ये परिसंवाद



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भागूबाई चांगू ठाकूर (बीसीटी) विधी महाविद्यालय यांच्या आरोग्य सल्लागार समिती व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने अमली पदार्थांचे सेवन व अवैध तस्करी विरुद्ध आंतरराष्ट्रीय दिनानिमित्त परिसंवाद आयोजित करण्यात आला होता.

नशा मुक्त भारत अभियान व्यसनमुक्त भारत अभियान बद्दल जागरूकता वाढवणे आणि लोकांना संवेदनशील करणे हा या परिसंवादाचा उद्देश होता. २३ जून २०२३ रोजी कॉलेजच्या सेमिनार हॉलमध्ये झालेल्या या सेमिनारमध्ये विद्यार्थी, प्राध्यापक आणि विशेष अतिथींचा सक्रिय सहभाग दिसून आला. विविध क्षेत्रातील मान्यवर वक्त्यांनी व्यसनाधीनतेच्या मानसिक, न्यूरोलॉजिकल, सामाजिक आणि कायदेशीर पैलूंवर प्रकाश टाकला आणि अमली पदार्थांच्या दुरुपयोगाच्या व्यापक समस्येवर मौल्यवान अंतर्दृष्टी प्रदान केली.

सहाय्यक प्राध्यापिका अपराजिता गुप्ता यांनी स्वागतपर भाषण केले, सर्व उपस्थितांचे कृतज्ञता व्यक्त केले आणि व्यसनमुक्त समाजाला चालना देण्यासाठी परिसंवादाचे महत्त्व पटवून दिले. प्रभारी प्राचार्य धनश्री कदम यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. व्यसनमुक्ती मानसशास्त्रातील प्रख्यात तज्ज्ञ डॉ. विशाल गाणार यांनी व्यसनमुक्तीच्या मानसशास्त्रीय कोनांवर आपले ज्ञान सांगितले.

न्यूरोलॉजिस्ट डॉ. प्रियदर्शिनी यांनी व्यसनाच्या न्यूरोलॉजिकल प्रभावावर चर्चा केली, लवकर हस्तक्षेप आणि प्रतिबंधात्मक उपायांच्या गरजेवर भर दिला. सामाजिक कार्यकर्ते राम मस्के यांनी अंमली पदार्थांच्या सेवनामुळे उद्भवणाऱ्या सामाजिक समस्या आणि या समस्येचा सामना करण्यासाठी समुदायाच्या सहकार्याचे महत्त्व अधोरेखित केले.

अधिवक्ता शुभांगी ढेमसे यांनी कायदे आणि अंमलबजावणीच्या भूमिकेवर भर देत कायदेशीर दृष्टीकोनातून व्यसनाला आळा घालण्यासाठी धोरणे मांडली. जगन्नाथ साळुंके यांनी तंबाखूचे व्यसन आणि त्याची मूळ कारणे याविषयी मौल्यवान अंतर्दृष्टी दिली आणि त्याच्याशी संबंधित धोक्यांबद्दल जागरूकता निर्माण केली.

कार्यक्रमादरम्यान उपस्थितांनी, विद्यार्थी, प्राध्यापक आणि कर्मचारी सदस्यांनी व्यसनमुक्ती समाज निर्माण करण्यासाठी आपली वचनबद्धता व्यक्त केली. सेमिनारला सहाय्यक प्राध्यापक रवनिश बेक्टर, सहाय्यक प्राध्यापिका डॉ. ममता गोस्वामी, सहायक प्राध्यापक भाग्यश्री कांबळे, सहायक प्राध्यापक राघव शर्मा, सहायक प्राध्यापक अपराजिता गुप्ता, सहायक प्राध्यापक सागर देवघरे, ग्रंथपाल जान्हवी भोईर यांचे मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले.

चर्चासत्राच्या यशस्वीतेसाठी त्यांच्या कौशल्याचा आणि सहभागाचा मोठा वाटा आहे. भागूबाई चांगू ठाकूर कॉलेज ऑफ लॉ हे सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी शिक्षणाच्या सामर्थ्यावर आणि समुदायाच्या सहभागावर विश्वास ठेवतात. यासारख्या चर्चासत्रांच्या माध्यमातून, जागरुकता वाढवणे, व्यक्तींना सक्षम करणे आणि व्यसनाच्या तावडीतून मुक्त समाज निर्माण करणे हे महाविद्यालयाचे उद्दिष्ट आहे.

## अमली पदार्थ दुष्परिणामांबाबत गव्हाण विद्यालयात मार्गदर्शन

**पनवेल : वार्ताहर**

जागतिक अमली पदार्थ दिनाचे अनुषंगाने हद्दीतील रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी महाराज हायस्कूल व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेज गव्हाण-कोपर येथे पोलीस ठाणे व आशा की किरण सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने अमली पदार्थ जनजागृतीचे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्याला विद्यार्थी, शिक्षक तसेच पालक व पोलीस ठाण्यातील कर्मचारी व अधिकारी उपस्थित होते.

या कार्यक्रमात शाळेचे सुमारे ३०० विद्यार्थी, शिक्षक तसेच पोलीस ठाणे कडील अंमलदार सहभाग घेतला होता. त्यावेळी उपस्थितांना न्हावा शेवा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजीव धुमाळ तसेच सामाजिक संस्थेचे बशीर भाई कुरेशी यांनी अमली पदार्थाचे दुष्परिणाम, तोटे व कायद्याबाबत मार्गदर्शन केले आणि व्यसनापासून दूर राहण्याच्या सूचना दिल्या.



# प्रकल्पग्रस्तांना लावलेला कर रद्द करण्याची मागणी

### भाजपचे सुधीर पाटील यांचे उपमुख्यमंत्र्यांना पत्र

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका कार्यक्षेत्रामधील प्रकल्पग्रस्त नागरिकांना आकारण्यात येणारा मालमत्ता कर रद्द करण्यात यावा. कर आकारणी रद्द करता येत नसेल तर सार्वजनिक सुविधांसाठीचे ३.७५ टक्के भूखंड परत करावेत, अशी मागणी भाजप कामगार मोर्चाचे कोकण विभागीय उपाध्यक्ष सुधीर पाटील यांनी केली आहे.

मालमत्ताकराविषयी निवेदन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देण्यात आले आहे. या निवेदनामध्ये महापालिका कार्यक्षेत्रामधील मूळ गावे, सिडकोच्या माध्यमातून संपादित केलेली जमीन, क्रीडांगणाची सुविधा पुरविणे, ग्रामपंचायत कार्यालय, समाजमंदिर बांधणे तसेच पथदिवे व इतर सुविधा देणे आवश्यक होते. सिडकोने प्रकल्पग्रस्तांना वाटप करण्यात प्रकल्पग्रस्तांना साडेबारा टक्के आलेले साडेबारा टक्के योजनेचे योजनेचे भूखंड देताना सार्वजनिक भूखंड व पालिकेची स्थापना सुविधेसाठी ३.७५ टक्के भूखंड राखीव ठेवलेले असताना मांडण्यात आली आहे.

सिडकोने मूळ मालमत्ताकर का आकारण्यात येतो. गावांसाठी पाणीपुरवठा करणे, शाळा, अशी विचारणा केली आहे.

महापालिकेने सर्व प्रकल्पग्रस्तांना मालमत्ता कर माफ करावा. मालमत्ता कर सुरूच ठेवण्यात येणार असेल तर सार्वजनिक सुविधेसाठी विकसित भूखंडातून कपात केलेले ३.७५ टक्के भूखंड परत प्रकल्पग्रस्तांना देण्यात यावेत, अशी मागणीही पत्राद्वारे सुधीर पाटील यांनी उपमुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

# अमृत अभियानाच्या केंद्रीय पथकाची नवी मुंबईत पाहणी

**नवी मुंबई : बातमीदार**

केंद्र सरकारच्या गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालयाच्या वतीने अमृत व अमृत २.० अभियानांतर्गत नवी मुंबई महापालिकेच्या वतीने सुरू असलेल्या प्रकल्पांस केंद्रीय अमृत अभियान पथकाने भेट देऊन सविस्तर माहिती घेत तसेच प्रत्यक्ष पाहणी करीत समाधान व्यक्त केले.



या वेळी नवी मुंबई महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी पथकाचे प्रमुख गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालय, भारत सरकार यांचे उपसचिव हरिश्चंद्र प्रसाद, अमृत पथकाच्या सदस्या सिद्धी मोहटा, अर्नेस्ट अँड यंगच्या प्रोजेक्ट मॉनिटरिंग युनिटचे आयटी मॅनेजर परितोष धवन, महाराष्ट्र नागरी विकास अभियान संचनालयाचे कार्यकारी संचालक मनोहर हिरे यांचे नवी मुंबई महापालिकेच्या वतीने स्वागत केले. या वेळी शहर अभियंता संजय देसाई, उद्यान विभागाचे उपायुक्त दिलीप नेरकर, अतिरिक्त शहर अभियंता मनोज पाटील, कार्यकारी अभियंता अरविंद शिंदे व अजय संखे आणि इतर अधिकारी उपस्थित होते.


अमृत व अमृत २.० या अभियानांतर्गत नवी मुंबई महापालिकेने राबविलेल्या प्रकल्पांची या वेळी सादरीकरणाद्वारे सविस्तर माहिती देण्यात आली. त्या अनुषंगाने विविध मुद्द्यावर चर्चा करीत पथकातील सदस्यांनी या प्रकल्पांद्वारे नागरी सुविधांमधील वाढ तसेच पर्यावरण संरक्षण व संवर्धनासाठी या प्रकल्पांचा होणारा लाभ याविषयी अधिक माहिती जाणून घेतली.

याशिवाय नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील मालमत्तांच्या जीआयएस मॅपिंगची सद्यस्थिती पथकाने जाणून घेतली तसेच ज्या पाण्यापासून महसूल प्राप्त होत नाही असे नॉन रेव्हेन्यू वॉटर रोखण्यासाठी नवी मुंबई महापालिकेच्या वतीने करण्यात आलेल्या विविध उपायोजनांची माहिती जाणून घेण्यात आली व या उपायोजनांबाबत समाधानही व्यक्त करण्यात आले.

प्रक्रियाकृत सांडपाण्याच्या होत असलेल्या वापराचे प्रमाण जाणून घेतले तसेच उद्योग समुहांना देण्यात येणाऱ्या या पुनर्प्रक्रियाकृत पाण्यामुळे पिण्याच्या पाण्याची बचत होत असल्याबदद्ल समाधान व्यक्त केले.

नवी मुंबई महापालिकेने केंद्र शासनाच्या गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालयाच्या वतीने सुरू असलेल्या अमृत व अमृत २.० या अभियानामध्ये राबविलेल्या प्रकल्पांची चांगल्या रितीने पर्यावरणपूरक अंमलबजावणी केली असल्याबद्दल केंद्रीय पथकाने समाधान व्यक्त केले.

# स्वातंत्र्यसैनिकांच्या कुटुंबीयांची आमदार गणेश नाईकांनी घेतली भेट; मोदी सरकारच्या कामगिरीची दिली माहिती



**नवी मुंबई : बातमीदार**

केंद्रातील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या लोककल्याणकारी सरकारला नऊ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने मोदी९ महा जन संपर्क अभियान भारतीय जनता पक्षाच्या वतीने देशभर हाती घेण्यात आले आहे. या अंतर्गत 'संपर्क से समर्थन' अभियानांतर्गत आमदार गणेश नाईक यांनी ऐरोली विधानसभा क्षेत्रातील घणसोली विभागातील प्रभावशाली व्यक्तींच्या त्यांच्या निवासस्थानी भेटी घेतल्या. खास करून स्वातंत्र्य सैनिकांचा गाव म्हणून परिचित असलेल्या घनसोली येथील दिवंगत स्वातंत्र्यसैनिकांच्या कुटुंबीयांच्या भेटी घेऊन त्यांचा भावपूर्ण गौरव केला.

या भेटीदरम्यान आमदार गणेश नाईक यांनी प्रभावशाली व्यक्तींचा त्यांच्या कर्तबगारीबद्दल आणि देशाच्या विकासामध्ये त्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल सन्मान केला. पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारने मागील नऊ वर्षांमध्ये केलेला देशाचा सर्वांगीण विकास आणि यशस्वीपणे राबवलेल्या जनकल्याणाच्या योजनांचे माहिती पुस्तक सत्कारमूर्तींना भेट देण्यात आले. डॉक्टर, स्वातंत्र्य सैनिकांचे कुटुंबीय, वकील, सनदी लेखापाल, माजी सैनिक, राज्यस्तरीय आणि राष्ट्रीय खेळाडू, क्रीडा प्रशिक्षक, माजी मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षिका, कलाकार, व्यावसायिक, वैज्ञानिक, अंगणवाडी सेविका, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, बँकिंग क्षेत्रातील अधिकारी, प्राध्यापक, सफाई कर्मचारी, निवृत्त सरकारी अधिकारी अशा सर्व वर्गवारीतील प्रभावशाली व्यक्तींची भेट घेऊन त्यांच्याशी लोकनेते नाईक यांनी संवाद साधला.

या वेळी स्वातंत्र्य सैनिकांच्या कुटुंबीयांपैकी शंकर पाटील यांचे कुटुंबीय, काळ्यापाण्याची शिक्षा भोगलेले ताम्रपटधारक स्वातंत्र्य सैनिक कैलास वासी रामा दिवड्या रानकर यांचे कुटुंबीय, कै. चाहो पाटील यांचे कुटुंबीय, कै. हाल्या म्हात्रे यांचे नातेवाईक, कै. नारायण मढवी यांचे नातेवाईक, कै. महादू पाटील आणि वाल्मीक पाटील यांचे नातेवाईक, कै. रघुनाथ पवार यांचे कुटुंबीय, कै. वामन पाटील आणि जोमा पाटील यांचे कुटुंबीय, कै. परशुराम पाटील यांचे नातेवाईक यांचा सन्मान करण्यात आला.

संपर्क से समर्थन अभियानांतर्गत आमदार गणेश नाईक यांच्यासोबत माजी महापौर सागर नाईक, माजी नगरसेवक घनश्याम मढवी, परिवहन समितीचे माजी सभापती दिलीप म्हात्रे, घणसोली गावकीचे अध्यक्ष शिवराज मढवी, सामाजिक कार्यकर्ते चेतन पाटील, विश्वनाथ म्हात्रे आदी उपस्थित होते.

# नवी मुंबईत संघर्षाचे ऊर्जास्थान दि. बा. पाटील स्पर्धा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

प्रकल्पग्रस्तांचे अर्ध्वयू लोकनेते दि. बा. पाटील यांच्या समर्पित कार्यास उजाळा देऊन त्या माध्यमातूनन युवा पिढीला संघर्षासाठी प्रेरीत करणे, या उद्देशाने नवी मुंबई स्तरावर 'संघर्षाचे ऊर्जास्थान-दिबा' या स्पर्धात्मक उपक्रमाचे नवी मुंबई पुनर्वसन सामाजिक संस्थेच्या वतीने आयोजन करण्यात आले आहे.

लोकनेते दि. बा. पाटील यांच्या १०व्या स्मृतिदिनानिमित्त वाशीगांव येथे आयोजित अभिवादन कार्यक्रमामध्ये संस्थेचे अध्यक्ष तथा नवी मुंबई महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत यांनी या उपक्रमाची घोषणा केली आहे. या वेळी स्थानिक नगरसेविका फशीबाई भगत, वैजयंती भगत, नमुंमपा शाळा क्र. २७ च्या मुख्याध्यापिका प्राची ठाकूर यांच्या सह शिक्षकवृंद, विद्यार्थी आणि वाशीगाव ग्रामस्थ यांनी दि. बां ना आदरांजली अर्पण केली. या वेळी सर्व वाशीगांव महापालिका शाळेतील सर्व शिक्षकांचा सन्मान, गुणवंत शालेय विद्यार्थ्यांचा गुणगौरव व वृक्षारोपण असे 'दिबां'ना समर्पित कार्यक्रम राबविण्यात आले.

लोकनेते दि. बा. पाटील यांच्या १०व्या स्मृतिदिनानिमित्ताने दशरथ भगत यांनी नवी मुंबई पुनर्वसन सामाजिक संस्थेतर्फे संघर्षाचे ऊर्जास्थान-दिबा' लोकनेते दि. बा. पाटील पीएचडी स्पर्धा (लिखित, डिजिटल व आरास स्वरुपात) या भव्य उपक्रमाचे आयोजन जाहीर केले आहे.

या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धेकांनी लोकनेते दिबांच्या संघर्ष जीवनावर प्रोजेक्ट तयार करणे, व्हिज्युअल डॉक्युमेंटरी बनविणे, 'दिबां'च्या जीवनप्रवासावर स्फुर्तीगीते बनविणे, 'दिबां'च्या विविध आंदोलनांच्या चित्रांचे रेखाटन करणे, यासह यंदाच्या श्रीगणेशोत्सवात काळात बाप्पासमोर याच विषयावर घरगुती व सार्वजनिक मंडळ अश्या दोन्ही स्तरावर आरास हा विषयदेखील या स्पर्धा उपक्रमात समाविष्ट करण्यात आला आहे.

उपक्रम केवळ नवी मुंबई महापालिका हद्दीतील सर्व क्षेत्रातील सर्व वयोगटातील नागरिकांसाठी मर्यादित आहे. संघर्षाचे ऊर्जास्थान-दिबा' लोकनेते दि. बा. पाटील पीएचडी स्पर्धा उपक्रमांतर्गत सहभागी होणाऱ्या ग्रामीण, शहरी आणि झोपडपट्टी भागातील विजेत्यांना एकूण १० लाख रक्कमेच्या बक्षिसांसह सन्मानचिन्ह व प्रेरणा प्रशस्तीपत्रक देऊन विशेष सन्मान सोहळ्यात गौरविण्यात येणार असल्याचे दशरथ भगत यांनी सांगितले.



# नवी मुंबईत टिफीन बैठक | आमदार रमेश पाटील यांची प्रमुख उपस्थिती

**नवी मुंबई : बातमीदार**

भारतीय जनता पक्षाच्या महासंपर्क अभियाना अंतर्गत भाजप आमदार रमेश पाटील यांच्या वतीने नवी मुंबई येथे टिफिन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील सरकारने गेल्या ९ वर्षांमध्ये केलेली कामगिरी सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी भारतीय जनता पार्टीकडून पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण देशभरात महासंपर्क अभियान सुरू करण्यात आले आहे. त्यानुसार टिफीन पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी केंद्राच्या योजना व देशाची सुरू असलेली प्रगती याबाबत नागरीकांना माहिती देण्यात आली.

या अभियानांतर्गत विविध कार्यक्रम आयोजित करावयाचे असून मोदी सरकारच्या लोक कल्याणकारी योजनांची माहिती समाजातील सर्व स्तरातील लोकांपर्यंत पोहोचवून सरकारच्या योजनांपासून वंचित राहिलेल्या नागरिकांना या योजनांशी जोडणे हेच या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट आहे. त्या अनुषंगाने महासंपर्क अभियानांतर्गत आमदार रमेश पाटील यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यात विविध कार्यक्रम आयोजित केले आहेत. त्याचप्रमाणे नवी मुंबई येथे टिफिन बैठकीचे आयोजन करून त्यांनी मोदी सरकारच्या ९ वर्षातील कामगिरीची माहिती दिली.

या वेळी आमदार रमेश पाटील यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नेतृत्वातील सरकारने ९ वर्षे यशस्वीपणे पूर्ण केली असून मोदीजींच्या नेतृत्वात आपल्या देशाची प्रतिष्ठा जगभर उंचावत असल्याचे सांगितले. तसेच देशातील सर्वसामान्य जनतेकरीता अनेक कल्याणकारी योजना सुरू केल्या असून या योजनांचा असंख्य लाभार्थ्यांना फायदा झाला आहे. या ९ वर्षाच्या काळात मोदी सरकारने सर्जिकल स्ट्राईक, कलम ३७० हटवणे, तिहेरी तलाक विरोधी विधेयक असे धाडसी निर्णय घेतले. त्याचप्रमाणे हिंदूचे श्रद्धास्थान असलेल्या प्रभू श्रीरामांचे आयोध्या येथे भव्य मंदिर उभारण्याचे काम सुरू असल्याचे सांगून पंतप्रधान मोदी यांचे नेतृत्वाखाली देशाची महाशक्तिशाली बनण्याकडे वाटचाल सुरू असून येणाऱ्या काळात आपला देश महाशक्तिशाली बनेल अशी आशा व्यक्त केली.

या वेळी अॅड. चेतन पाटील, हरीश पांडे सरचिटणीस युवा मोर्चा नवी मुंबई, विजय मिश्रा जिल्हा उपाध्यक्ष भाजप नवी मुंबई, नितीन कंधारी उपाध्यक्ष भाजप नवी मुंबई, जयश्री कुमार, ऑड्री डिसोजा, दीपक चौधरी, राजाराम सिंग, राजेश पठानिया तसेच इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## निवडक

### निकम स्कूलमध्ये रोबोटिक लॅब

**माणगाव** : माणगाव एज्युकेशन ट्रस्ट संचालित एस. एस. निकम इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर सायन्स कॉलेजमध्ये रोबोटिक लॅबचे उद्घाटन नुकतेच दंतवैद्य डॉ. दिलीप गाडगीळ यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्ष डॉ. मदन निकम यांच्या पुढाकाराने या लॅबची स्थापना करण्यात आली. उद्घाटनासाठी सुलभा मदन निकम, संस्थेचे अध्यक्ष डॉ. मदन निकम, प्राचार्या संगिता कोकाटे, कोऑर्डीनेटर प्रा. विजय पाईकराव व शैलेश जाधव उपस्थित होते.



### रोह्यात महिलांसाठी सामूहिक योगा

**रोहे** : रोहा अष्टमी नगर परिषदेच्या वतीने जागतिक योग दिनानिमित्ता सामूहिक योग व प्राणायाम कार्यक्रम घेण्यात आले. महिला व बालकल्याण विभागांतर्गत मुख्याधिकारी पंकज भुसे यांच्या मार्गदर्शनातून आयोजित कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. योग प्रशिक्षक विभा चोरगे यांनी योग व प्राणायाम या विषयावर मार्गदर्शन केले. या वेळी उपस्थित महिलांकडून योगासने, प्राणायाम करून घेतले.



### आरोग्य अधिकारीपदी डॉ. भारसाखळे



**माणगाव** : तालुका आरोग्य अधिकारी गोपाळप्रसाद परदेशी हे निवृत्त झाल्यामुळे त्या रिक्त पदावर निजामपूर प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. सुशीम भारसाखळे यांची नियुक्ती केली आहे. डॉ. भारसाखळे यांची तालुका आरोग्य अधिकारी पदी नियुक्ती झाल्याबाद्दल निजामपूर प्रा. आ. केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रवीण आरसाळे, हिवताप विभाग आरोग्य पर्यवेक्षक राजेंद्र मंडपे, हिवताप विभाग तांत्रिक पर्यवेक्षक राजेंद्र पाटील, जिल्हा हिवताप संघटना आरोग्य सेवक तथा सरचिटणीस राजेंद्र खाडे, आरोग्य सेवक जिल्हा संघटक सुनील मोरे, माणगाव शहर आरोग्य सेवक भगवान कदम, तालुका आरोग्य अधिकारी आरोग्य सहाय्यक संजय राऊत, लेखापाल विनोद सावळ आदींनी अभिनंदन केले.

### बँक ऑफ इंडिया शाखेचे स्थलांतर

**अलिबाग** : बँक ऑफ इंडिया अलिबाग शाखेचे जोगळेकर नाका येथील पॅसिफिक इमारतीत स्थलांतर झाले. त्याचे उद्घाटन बँक ऑफ इंडियाचे कार्यकारी संचालक सुब्रतो कुमार यांच्या हस्ते झाले. बँकेचे नाते बँकिंग पलिकडचे या ब्रीदवाक्याप्रमाणे ग्राहकांच्या बँकिंग गरजा पूर्ण करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, असे प्रतिपादन नॅशनल बँकिंग समूह पश्चिम विभागाचे महाप्रबंधक सुब्रतोकुमार रॉय यांनी केले. रायगड विभागाचे विभाग प्रमुख मुकेश कुमार, उपविभाग प्रमुख जॉन लोबो, अग्रणी बँक प्रबंधक विजयकुमार कुलकर्णी, शाखाधिकारी सनी बर्नवाल, नाबार्डचे जिल्हा विकास अधिकारी प्रदीप अपसुंदे तसेच आणि विभागीय कार्यालयाचे पदाधिकारी आणि ग्राहक उपस्थित होते. शाखेमध्ये असलेल्या ग्राहकांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले.




### दाखणे शाळेत साहित्यवाटप



**माणगाव** : दाखणे शाळेतील इ. पहिली ते सातवीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना वनमाळी शेठ विनायक इंजिनिअरिंग यांच्यातर्फे गुरुवारी (दि. २२) शालेय साहित्याचे वाटप विघवली केंद्राचे केंद्रप्रमुख सुरेश म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास पदवीधर शिक्षक शंकर शिंदे, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य व पालक बळीराम उभारे, रश्मी मुंढे, सुरेख उभारे, रुंजी उभारे, अस्मिता उभारे, रुचिता उभारे, मानसी उतेकर, गौरी पालकर, सुजाता उभारे, सुरेख पवार, रविना उभारे, शाळेच्या मुख्याध्यापिका उर्मिला शिंदे, सहशिक्षक संदीप साळवी, संदीप लटके आदी उपस्थित होते.

### स्वच्छ व अतिक्रमणमुक्त रस्ते अभियान



**रोहे** : जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांचे मार्गदर्शनाखाली रोहा नगरपालिका क्षेत्रात स्वच्छ व अतिक्रमणमुक्त अभियान शुक्रवारी (दि. २३) राबविण्यात आले. या अभियानात रोहा नगर परिषद अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले. अधिकारी, कर्मचारी व सफाई कामगारांनी रोहा शहरातील तहसील कार्यालय व बायपास परिसर स्वच्छ केला. या वेळी नगर परिषदेचे प्रशासन अधिकारी श्रीनिवास पाटील, शहर अभियंता प्रशांत माने, रवींद्र चाळके, कार्यालयातील राजेश सांबरे, आनंद बंडगर, अमेय गायकवाड, निलेश चाळके, मिलिंद पायगुडे, विशाल शिंदे, मदन शिवशरण, रचना पार्टे सहभागी झाले होते.

# मुरूडमधील पाणी प्रश्न लवकरच मार्गी

## ■ आंबोली ते नांदगाव पाणीपुरवठा योजनेचे भूमिपूजन

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यात २४ ग्रामपंचायती असून या सर्व ग्रामपंचायतींची पाणीटंचाई संपुष्टात आणण्यासाठी जलजीवन मिशन योजनेंतर्गत केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून ३९ कोटी रुपये खर्च करून आंबोली ते नांदगाव पाणीपुरवठा योजना कार्यान्वित होणार आहे. यामुळे सात ग्रामपंचायतींना मुबलक पाणीपुरवठा होणार आहे.

मुरूडसह अलिबाग व रोहा या तालुक्यासाठी २४१ कोटी रुपये पाणीयोजना मंजूर केल्या असून पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांचे विशेष सहकार्य लाभल्याचे आमदार महेंद्र दळवी यांनी सांगितले.



खारआंबोली ते नांदगाव या सात ग्रामपंचायतींना नळ पाणीपुरवठा योजनेचा भूमिपूजन सोहळा शुक्रवारी (दि. २३) मजगाव येथे झाला. महाराष्ट्र जीवन प्राधिरणाचे उपअभियंता कोठेकर यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले. या वेळी उपजिल्हा प्रमुख रुपेश पाटील, भरत बेलोसे, माजी नगराध्यक्ष स्नेहा पाटील, नांदगाव ग्रामपंचायतीचे माजी सरपंच भाई सुर्वे, विघ्नेश माळी, दामोदर राऊत, सुनील दिवेकर, माजी सरपंच मनोज कमाने, तालुका संघटक दिनेश मिणमिण, निलेश घाटवळ, अमित कोळी, यशवंत पाटील आदी उपस्थित होते.

आमदार दळवी आपल्या भाषणात म्हणाले की, आतापर्यंत मुरूड तालुक्यात तीन हजार कोटींची कामे सुरू आहेत. शहराप्रमाणेच ग्रामीण भागाचासुद्धा विकास होणार आहे. कार्यकर्त्यांनी २४ ग्रामपंचायतींचे सर्वेक्षण करून आवश्यक सर्व कामे तातडीने पूर्ण करणार आहे. मुरूड-अलिबाग रस्त्याच्या कामालासुद्धा पावसाळ्यानंतर सुरुवात होणार आहे. सहा महिन्यांच्या आत एमजीपीने ही योजना पूर्ण करावी, असा आशावाद या वेळी त्यांनी व्यक्त केला. नऊ महिन्यांच्या आत ग्रामीण भागाच्या विकासासाठी कोटच्यवधी रुपये आणणार असून विकासाची कामे मार्गी लावणार असल्याचे प्रतिपदान त्यांनी केले. माजी सरपंच मनोज कमाने व विघ्नेश माळी यांनीही मार्गदर्शन केले.

## फणसाड प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेचे भूमिपूजन; बोर्लीत दिलासा



**रेवदंडा : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यात बोर्ली नाक्यावर फणसाड प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेचे भूमिपूजन आमदार महेंद्र दळवी यांचे हस्ते झाले.

या वेळी पेण युवासेना उपजिल्हा प्रमुख रूपेश पाटील, उपजिल्हा प्रमुख भरत बेलोसे, शिवसेना नेते सी. एम. ठाकूर, जिल्हा नियोजन समिती सदस्य निलेश घाटवळ, अलिबाग तालुका प्रमुख प्रफुल्ल मोरे, सुनील दिवेकर, उपतालुका प्रमुख भगिरथ पाटील, भारत मोती, सुरेश पालवणकर, सनी सोंगावकर, महिला तालुका प्रमुख दिपश्री पाटील, बोर्ली शाखा प्रमुख राजू भोईर, सतेज ठाकूर, मुरूड तालुका युवा प्रमुख अमोल लाड, शैलेश रातवडकर, धर्मेंद्र गायकवाड, डॉमणिक पेनॉ आदी उपस्थित होते.

बोर्ली पंचक्रोशीत पाण्याची गंभीर समस्या लक्षात घेऊन आमदार महेंद्र दळवी यांच्या प्रयत्नाने फणसाड प्रादेशिक पाणीपुरवठा अंतर्गत १८ कोटी पाच लाख रुपये निधी उपलब्ध करण्यात आला आहे.

## पावसासाठी कालवली येथे विशेष नमाज

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यामध्ये असलेल्या कालवली गावात शुक्रवारी (दि. २३) पाऊस पडण्यासाठी विशेष नमाज अदा करण्यात आली. या वेळी मुस्लिम बांधवांनी खुल्या आकाशाखाली मौलाना अखलाख यांच्या मार्गदर्शनाखाली अदा केली.

कालवली गावात दिवाळीच्या दिवशी हिंदू-मुस्लिम बांधव एकत्र येऊन मशिदीमध्ये नमाज अदा करतात. या गावातील धार्मिक सलोखा वाखाणण्यासारखा असून शेतकऱ्यांना आणि सर्वच ग्रामस्थांना पावसाची ओढ लागल्याने गेल्या अनेक दिवसांपासून ईश्वराकडे करुणा भाकण्याची अनावर इच्छा अनेकांनी आपसात व्यक्त केली.

पवित्र कुरआन शरीफमध्ये प्रेषित महंमद पैगंबर सल्लल्लाह यांनी कोणत्याही संकट काळात मोकळ्या मैदानात खुल्या आकाशाखाली निर्जन ठिकाणी सलातुल एस्तिस्का ही विशेष नमाज अदा करून अल्लाहला प्रार्थना करण्यासाठी सुचविले आहे. त्यानुसार कालवली येथील मौलाना अखलाक यांच्या मार्गदर्शनाखाली पवित्र कुरआन शरिफमधील निर्देशानुसार कालवली येथील मुस्लिम बांधवांनी नमाजपठण केले.



## पेण नगरपालिकेने अतिक्रमणावर फिरवला हातोडा

**पेण : प्रतिनिधी**

पेण नगरपालिकेने अतिक्रमणावर हातोडा फिरवत अतिक्रमण मोहीम यशस्वी केली, तसेच स्वच्छता व वृक्ष लागवड मोहीम राबवून शहर स्वच्छ व सुंदर करण्याचे आवाहन केले.

जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांच्या आदेशानुसार, पेण नगर परिषदेचे मुख्याधिकारी जीवन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील मुख्य रस्त्यावरील अतिक्रमण व स्वच्छता मोहीम राबवून मार्ग रहदारीसाठी मोकळा करण्यात आला.

पेण नगर परिषदेने कारवाई करीत रेल्वेस्टेशन ते आरटीओ असा एक किमीच्या पेण-खोपोली मार्गावरील अतिक्रमण हटवून रोड स्वच्छ केला. याच वेळी राबविण्यात आलेल्या वृक्षारोपण कार्यक्रमासाठी पेणचे आमदार रवीशेठ पाटील, प्रांताधिकारी प्रवीण पवार, तहसीलदार स्वप्नाली डोईफोडे, मुख्याधिकारी



जीवन पाटील, बांधकाम अभियंता सुहास कांबळे, विनायक बनसोडे, किरण शहा, शिवाजी चव्हाण, महेश वडके, कमलाकर आवास्कर, महेंद्र मोरे त्याचबरोबर पेण नगर परिषदेचे अधिकारी व कर्मचारी, पेण प्रायव्हेट हायस्कूल तसेच सार्वजनिक हायस्कूलचे विद्यार्थी या मोहिमेत सहभागी झाले होते.

नगरपालिकेने पाच दिवसांपूर्वी २४० जणांना नोटीस दिल्या होत्या. त्याचबरोबर काही व्यापाऱ्यांची बैठक घेऊन अतिक्रमण हटवण्याचे आदेश दिले होते. त्यामध्ये एकूण १५० लोकांनी स्वतःहून अतिक्रमण हटवून सहकार्य केले. दर महिन्याच्या एका विशिष्ट तारखेला ही कारवाई करणार असल्याचे पेणचे मुख्याधिकारी जीवन पाटील यांनी बोलताना सांगितले.

पेण नगर परिषदेने रस्त्यावर बेशिस्तपणे वाहने लावून वाहतूक कोंडी करणाऱ्या चालकांवरही कारवाई करावी, अशी मागणी जनतेतून होत आहे.

## भाजप युवा मोर्चा अध्यक्षपदी नागेश पाटील; सोशल मीडिया कार्यकारिणीही जाहीर

**खालापूर : प्रतिनिधी**

भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर व उरण मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांच्या निर्देशानुसार खालापूर तालुका युवा मोर्चा अध्यक्षपदी नागेश पाटील यांची नियुक्ती करण्यात आली. सोशल मीडिया कार्यकारिणीही जाहीर करण्यात आली.

यामध्ये अनिकेत साळुंखे यांची संयोजक, सहसंयोजक साहिल गोपाळे व विकास मोरे, कायदेशीर सल्लागार राजेंद्र भोईर, सदस्य भारती देशमुख, ऋतुजा पाटील, मंगेश पाटील, कुणाल कदम, अवधूत परांजपे, राजेश देवधरे व नवीन देशमुख यांची नियुक्ती करण्यात आली.

या वेळी बोलताना विठ्ठल मोरे यांनी, भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर जिल्ह्यात भाजप पूर्ण ताकदीने वाढीस लागला त्यांच्या दूरदृष्टीने तरूण मोठ्या संख्येने सामील होत आहेत. त्यांना नवी उमेद व भविष्याची गुरुकिल्ली मिळाली असल्याचे सांगितले.

भाजप खालापूर तालुका मंडळ अध्यक्ष रामदास ठोंबरे व भाजप जिल्हा उपाध्यक्ष विठ्ठल मोरे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. या वेळी खालापूर सरचिटणीस प्रवीण जांभळे, मन की बात खालापूर तालुका संयोजक दिपक जगताप, साजगाव विभागीय प्रमुख भरत महाडिक, चौक विभागीय प्रमुख गणेश मुकादम, पंकज शहा, रवींद्र मोरे, शीतल वाघरे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



## कोंढाणे धरणासाठी दिलेल्या जमिनीचे भाडे देण्याची प्रकल्पग्रस्तांची मागणी

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यात बांधण्यात येत असलेल्या कोंढाणे धरण प्रकल्पासाठी २०११पासून वापरण्यात आपल्या जमिनीचे भूभाडे द्यावे आणि नंतरच शासनाने जमिनीचे हस्तांतरण प्रक्रियेला सुरुवात करावी, अशी मागणी कोंढाणे धरणबाधित शेतकऱ्यांनी केली आहे.

कोंढाणे धरणासाठी सिडको महामंडळाकडून हालचाली सुरू झाल्या असून शासनाचे वतीने नोटीसा बजावण्यास सुरुवात झाली आहे. कोंडीवडे गावाच्या हद्दीत उल्हास नदीवर धरण बांधले जाणार आहे. शेतकऱ्यांना बैठक घेऊन सर्व माहिती दिली जाईल, असे निवेदन सक्षम अधिकारी यांनी स्पष्ट केले होते, मात्र बैठक घेण्यात आलेली नाही आणि २२ जून रोजी निर्णय घेण्याची मुदत संपली आहे. त्यामुळे आधी



२०११पासून धरणाच्या कामासाठी वापरलेले पैसे द्यावे आणि नंतरच धरणासाठी जमिनीचे हस्तांतरण करावे, अशी मागणी केली आहे.

जमिनीचा एकरी किती मोबदला देणार, भू भाडे, पूनर्वसन दाखला, प्रकल्पग्रस्त कुटुंबातील एकाला नोकरी याबाबत लेखी पत्र आम्हाला जोपर्यंत मिळणार नाही तो आम्ही भूसंपादनाला संमती देणार नाही, असे समीर गायकवाड, भरत खेडकर, राजु मरवडे, मनोज गोगटे, शैला निकम यांनी सांगितले.

## कॉपर वायर चोरून चोरटा फरार

**माणगाव : प्रतिनिधी**

डीइटीसी इंस्पेक्शन कारच्या केबिनमधून एक लाख ७२ हजार ४३२ रुपयांची कॉपर वायर चोरून अज्ञात चोरटा फरार झाला आहे. ही घटना २२ ते २३ जूनदरम्यान माणगाव रेल्वे स्टेशनजवळ घडली. याबाबतची फिर्याद रवी गिरी (वय २९, रा. साबळे संकुल) यांनी दिली.

अज्ञात चोरट्याने फिर्यादी रवी गिरी यांच्या ताब्यातील डीइटीसी इंस्पेक्शन कार(९४३०१५)च्या केबिनचे लॉक तोडून त्यामधील एक लाख २७ ७२ हजार ४३२ रुपयांची कॉपर वायर चोरून नेली. या घटनेची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. घटनेचा अधिक तपास पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक आघाव हे करीत आहेत.

## उभ्या ट्रकला भरधाव ट्रकची धडक



**पोलादपूर** : मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर गुरूवारी (दि. २२) रात्री उभ्या असलेल्या ट्रकला भरधाव ट्रकची धडक बसून झालेल्या भीषण अपघातामध्ये दोन्ही ट्रक रस्त्यावर जागीच कलंडल्याची घटना झाली.

रत्नागिरीहून मुंबईकडे जाणारा ट्रक (एमएच ११एएल ७१७६) हॉटेल गोल्डन पॅलेससमोर भरधाव वेगाने आला असता महामार्गावर उभा असलेल्या ट्रकला (एमएच ४३ बीपी ४८८३) मागून धडक दिल्याने दोन्ही ट्रक महामार्गावर दोन्ही ट्रक रस्त्याच्या मध्यभागी कलंडून वाहतूक काही काळ ठप्प झाली.

सुदैवाने जीवितहानी झालेली नाही. पोलिसांनी क्रेन मागवून दोन्ही ट्रक उभे करून वाहतूक सुरळीत करण्यासाठी अथक प्रयत्न केले.

# निजामपूरच्या वैभवात पडणार भर; दोन तलावांचे सुशोभीकरण

**माणगाव : प्रतिनिधी**

निजामपूर येथील बारमाही पाणी असणाऱ्या शिवकालीन तलावाचे सुशोभिकरणासाठी निजामपूर ग्रामपंचायतीचे सरपंच राजाभाऊ रणपिसे यांनी आमदार भरत गोगावले यांच्याकडे सतत प्रश्न लावून धरीत पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नाला यश आले असून मोठ्या तलावासाठी पाच कोटी रुपये शासनाकडून मंजूर झाले आहेत.

या तलावालगत असणाऱ्या छोट्या तलावासाठी शासनाचा २५-१५ हेडमधून निधी उपलब्ध करून देण्याचे आमदार भरत गोगावले यांनी ग्वाही दिल्यामुळे निजामपूर व परिसरातील नागरिकांच्या भुवया आता उंचावल्या आहेत. त्यामुळे दोन्ही तलावांच्या सुशोभिकरणामुळे निजामपूरच्या वैभवात मोठी भर पडणार आहे.

पुणे-माणगाव मार्गावरील निजामपूर ग्रामसचिवालयाजवळ शिवकालीन तलाव आहे. या तलावात पाणी बारमाही असते, मात्र या तलावाची दुरुस्ती झाली



नव्हती. या तलावात नागरिक कपडे धुणे, गणपती विसर्जन करणे यासाठी या तलावातील पाण्याचा उपयोग केला जात होता. त्यामुळे हा तलाव दुर्लक्षित राहिला. या तलावाच्या सुशोभिकरणाला मोठ्या प्रमाणात निधी मिळत नसल्याने नागरिकांतून नाराजी पसरली होती. निजामपूर ग्रामपंचायत सरपंच रणपिसे यांनी नागरिकांच्या मागणीचा विचार करून या दोनही तलावाचे सुशोभिकरण करण्यासाठी खासदार व आमदार यांच्याकडे पाठपुरावा केला होता.

मोठ्या तलावाचे सुशोभीकरणाचे कामाला वेग आला असून उर्वरित तीन कोटींचा निधी मिळाल्यानंतर तलावाच्या चारही बाजूनी सुशोभीकरण केले जाणार आहे, तर या तलावालगत असणाऱ्या छोट्या तलावाचे नूतनीकरण व सुशोभिकरण केले जाणार असून नागरिकांना छोट्या तलावात गणपती विसर्जन करण्यासाठी पायऱ्या बसवण्यात येणार आहेत.

छोट्या तलावासाठी आमदार भरत गोगावले यांनी निधी देण्याची ग्वाही दिली, तर छोट्या तलावाच्या सुशोभिकरणासाठी माणगाव पं. स. माजी उपसभापती ममता फोंडके यांनी सन २०२१-२२मधील पं. स. च्या १५व्या वित्त आयोगातून साडेसहा लाखांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. त्यामुळे दोन्ही तलावाच्या सुशोभिकरणामुळे निजामपूरच्या वैभवात भर पडणार आहे.









पनवेल : प्रकल्पग्रस्तांचे झुंजार नेते दिवंगत दि. बा. पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त राज्याचे कौशल्य विकास रोजगार, उद्योजकता, पर्यटन, महिला व बालविकासमंत्री मंगलप्रभात लोढा, राज्याचे उद्योगमंत्री तथा रायगडचे पालकमंत्री उदय सामंत, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, कृती समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील यांनी संग्राम निवासस्थानी जाऊन अभिवादन केले. या वेळी माजी नगरसेवक नितीन पाटील, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, कामगार नेते सुरेश पाटील, 'दिबां'चे पुत्र अतुल पाटील, अभय पाटील आदी उपस्थित होते.














पनवेल : देशाचे यशस्वी व लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारला नऊ वर्षे पूर्ण झाली आहेत. या पार्श्वभूमीवर मोदी @ ९ कार्यक्रमांतर्गत महाजनसंपर्क अभियानाच्या अनुषंगाने पनवेल विधानसभा भाजपच्या वतीने लाभार्थी संमेलन उत्साहात झाले. या वेळी राज्याचे उद्योजकता व कौशल्य विकासमंत्री मंगलप्रभात लोढा यांची विशेष उपस्थिती लाभली. त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.



पनवेल : भूमिपुत्रांचे दैवत दिवंगत दि. बा. पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र रायगड-अलिबाग, लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समिती, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आगरी समाज मंडळाच्या पनवेल येथील महात्मा फुले सभागृहात पंडित दिनदयाळ उपाध्याय महारोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. राज्याचे उद्योगमंत्री तथा रायगडचे पालकमंत्री उदय सामंत यांनी या मेळाव्याला भेट दिली. या वेळी त्यांनी उपस्थितांशी संवाद साधून उपक्रमाची माहिती घेतली तसेच उमेदवारांना शुभेच्छा दिल्या.



















दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com